# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २०.११.२००४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

शनिवार दिनांक २०.११.२००४ रोजी मा.महापौर सौ.रूख्मीणी राधाकिसन शिंदे यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील ‘‘ प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह ‘‘ येथे दुपारी १२.४५ वाजता ‘‘ वंदेमातरम् ‘‘ या गिताने सुरू झाली. सभेला मा.आयुक्त यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सभासद उपस्थित होते.

०१. स.स.सौ.साधना गणेश सुरडकर
०२. स.स.श्री.घोडेले नंदकुमार राधाकिसन
०३. स.स.श्री.तनवाणी किशनचंद लेखराज
०४. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली
०५. स.स.श्री.तांबे गणेश रामचंद्र
०६. स.स.सौ.साजेदा बेगम विखार अहेमद
०७. स.स.श्री.शे.ईलियास किरमाणी शे.उमर
०८. स.स.श्री.औताडे रावसाहेब ममतू
०९. स.स.श्रीमती इंगळे शकुंतला सांडूजी
१०. स.स.श्री.रगडे भगवान दगडूजी
११. स.स.श्री.राजू रामराव शिंदे
१२. स.स.श्री.वाघ भाऊसाहेब बाबुराव
१३. स.स.सौ.पवार मंदाबाई प्रभाकर
१४. स.स.श्रीमती घायतिलक लिलावती बाळासाहेब
१५. स.स.श्री.जगताप मोतीलाल रघुनाथ
१६. स.स.श्रीमती किवळेकर जयश्री सारंग
१७. स.स.सौ.कचराबाई उत्तमराव लोंखडे
१८. स.स.श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
१९. स.स.श्रीमती डॉ.आशा बिनवडे
२०. स.स.श्रीमती मानकापे पार्वती लहानु
२१. स.स.सौ.विजया किशोर रहाटकर
२२. स.स.श्री.सावंत मधुकर दामोधर
२३. स.स.श्री.जबिंदा राजेंद्रसिंग तारासिंग
२४. स.स.श्री.साळवे माणिक लक्ष्मण
२५. स.स.श्री.प्रकाश भाऊराव निकाळजे
२६. स.स.श्री.नजर हमीद अ.गफुर
२७. स.स.श्री.शे.खाजा शे.शरफ़ोद्दीन
२८. स.स.सौ.कांबळे निर्मला विठ्ठल
२९. स.स.श्री.शिरसाठ संजय पांडूरंग
३०. स.स.श्री.डॉ.भागवत किसनराव कराड

३१. स.स.श्री.आनंद विनायकराव तांदुळवाडीकर
३२. स.स.सौ.रशिदा बेगम गफ़्फ़ार यारखान
३३. स.स.शिंदे किशोर रावसाहेब
३४. स.स.श्री.अ.कादर अ.हफ़ीज
३५. स.स.श्री.पंडागळे रतनकुमार नारायणराव
३६. स.स.श्री.नासेरखॉन सरदारखॉन
३७. स.स.श्री.मोहम्मद जावेद मोहम्मद इसहाक
३८. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
३९. स.स.सौ.खरात कुसूमबाई दौलत
४०. स.स.श्री.ताठे भाऊसाहेब
४१. स.स.श्री.तायडे पांडूरंग यशवंतराव
४२. स.स.सौ.मोरे जयश्री कुमारराव
४३. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
४४. स.स.सौ.कुलकर्णी जयश्री विजय
४५. स.स.श्री.पारे सोपान भाऊराव
४६. स.स.सौ.विमलताई भिकनसिंग राजपूत
४७. स.स.सौ.ताराबाई सुधाकर जेजूरकर
४८. स.स.श्री.गायकवाड राधाकृष्ण राजाराम
४९. स.स.सौ.संगिता बाळू मैंद
५०. स.स.श्री.रणधीरसिंग होलिये
५१. स.स.श्री.नासीरखान अ.रहेमान खान कुरैशी
५२. स.स.श्रीमती शाहीन जफ़र महेमुद ज़फर
५३. स.स.श्री.जैस्वाल चंद्रशेखर लक्ष्मीनारायण
५४. स.स.सौ.चंद्रभागाबाई दाणे
५५. स.स.श्री.ओक जयवंत केशवराव
५६. स.स.श्री.स.सलिम स.युसूफ़
५७. स.स.श्री.तकीहसन खान कासीमहसन खान
५८. स.स.श्री.गाजी सादोद्दीन गाजी जहीर अहेमद
५९. स.स.सौ.सिद्दीकी नईम सुलताना म.फ़सियोद्दीन
६०. स.स.श्री.अजिजखान गणीखान
६१. स.स.श्री.लकडे भरत श्रीपती
६२. स.स.श्री.सलिम पटेल समशेर पटेल
६३. स.स.श्री.तुलशीबागवाले किशोर बाबुलाल
६४. स.स.श्री.जगदीश कन्हैय्यालाल सिध्द
६५. स.स.श्री.स.अली सलामी स.मीरा सलामी
६६. स.स.सौ.निखत परविन एजाज अली

**(नामनिर्देशित पालिका सदस्य )**

०१. स.स.श्री.सुभाष लक्ष्मीनारायण कच्छवाह
०२. स.स.श्री.भगवान देविदास घडमोडे
०३. स.स.श्री.सुरजितसिंग खुंगर
०४. स.स.श्री.धिल्लन तरवेंद्रसिंग महेंद्रसिंग
०५. सौ.सलमा बानो मीर मोहम्मद अली

**संवाद :**

सौ.निखत परविन : नामवंत विधिज्ञ ॲडव्होकेट पै.अकबर पटेल यांचा नुकताच काही दिवसापूर्वी अज्ञात इसमानी गोळ्या घालून खून केला त्यांना या सभागृहातर्फे ०२ मिनिटे उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करावी या घटनेचा सभागृहातर्फे निषेध करण्यात यावा.

श्री.काशिनाथ कोकाटे : या शहरातील भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्राचे नेते,अनेक वर्षापासून या शहरात त्यांचे वास्तव्य होते. स्व.शरदभाऊ कुलकर्णी यांचे अल्पश: आजाराने निधन झालेले आहे. या शहराच्या विकासामध्ये त्यांचा सिंहाचा वाटा आहे. या सभागृहातर्फे त्यांना ०२ मिनिटे श्रध्दाजंली अर्पण करावी तसेच त्यांचे कुटूंबीयांना तसे कळविण्यात यावे. तसेच पै.ॲड.श्री.अकबर पटेल यांचेही निधन झालेले आहे, त्यांनाही श्रध्दाजंली अर्पण करावी, यास माझे अनुमोदन आहे.

मा.महापौर : ठिक आहे. पै.अकबर पटेल यांचा खून झाल्याच्या प्रकाराचा निषेध करण्यात येतो. श्रध्दाजंलीसाठी सर्वांनी उभे राहावे.

(याचवेळी सभागृहात स्व.शरदभाऊ कुलकर्णी तसेच पै.ॲड.अकबर पटेल यांना सभागृहाच्या वतीने ०२ मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.)

मा.महापौर : सर्व स.सभासद,अधिकारी,कर्मचारी यांना सभागृहाच्या वतीने ''दिपावली '' तसेच ''ईद'' निमित्त हार्दीक शुभेच्छा.

श्री.काशिनाथ कोकाटे : काल कांचीकाम कोटीचे धर्मगुरू श्री.शंकराचार्य यांना डीएमके सरकारने हस्तक्षेप करून त्यांना न्यायालयीन कोठडी केलेली आहे. या संदर्भात निषेधार्थ म्हणून काही नेते मंडळी कार्यालयाजवळ उपोषणास बसलेले आहे, त्यांच्या भावना समजावून घ्याव्यात. या प्रकाराबध्दल आजची सभा तहकूब करावी.

श्री.सुरजितसिंग खुंगर : हा सभागृहाचा विषय होत नाही. दुसऱ्या विषयावर चर्चा करावी.

श्री.तकीहसन खान : अशा विषयावर सभागृहात चर्चा करता येत नाही. विकास कामा बाबतच्या विषयावर चर्चा करावी.

(याचवेळी स.सभासद मोठमोठ्याने मा.महापौर यांचे डायससमोर जाऊन बोलतात, काहीही ऐकावयास येत नाही.)

मा.महापौर : एक तासासाठी सभा तहकूब करण्यात येत आहे. (वेळ दुपारी १२.५० वा. पुन्हा सभेस दुपारी १.४५ वाजता सुरूवात झाली.)

**विषय क्र. ४६८/१ :**

दिनांक ०५.०८.२००४, १६.०९.२००४ आणि दिनांक २०.१०.२००४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

सौ.विजया रहाटकर : विषय क्र.१ मध्ये दुरूस्ती करावी. दि.०५.०८.२००४ च्या इतिवृत्तातील पान क्र.४२ व विषय क्र.४५२ मधील क्र.१ व ठरावातील वर न करता मनपाच्या हे वाक्य गाळण्यात यावे.

सहा.संचालक (न.र.) : इतिवृत्त दि.५.८.०४ चे विषय क्र.४३६/७ मध्ये उपविधीचा नियम क्रमांक ३० असा उल्लेख ज्या ज्या ठिकाणी झालेला आहे, त्या ठिकाणी उपविधीचा नियम क्र.३१ अशी दुरूस्ती करण्यात यावी.

मुख्य लेखा परिक्षक : इतिवृत्त दि.५.८.०४ च्या विषय क्र.४१४/२ मधील पान क्र.७ वरील (ड)वाढीव खर्च खालील पहिला परिच्छेद प्रस्तावातून वगळण्यात यावे.

मा.महापौर : वरील दुरूस्तीसह विषय क्र.१ मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

दि.५.८.०४ च्या सर्वसाधारण सभा इतिवृत्त विषय क्र.४५२ मध्ये प्रस्ताव व ठरावातील 'वर न करता मनपाच्या ' हे वाक्य वगळण्यास, विषय क्र.४३६/७ मध्ये उपविधीचा नियम क्रमांक ३० असा उल्लेख ज्या ज्या ठिकाणी झालेला आहे, त्या ठिकाणी उपविधीचा नियम क्र.३१ अशी दुरूस्ती करण्यास आणि विषय क्र.४१४/२ मधील पान क्र.७ वरील (ड)वाढीव खर्च खालील पहिला परिच्छेद प्रस्तावातून वगळण्यास ई. वरील सर्व दुरूस्तीसह दि.०५.०८.२००४, १६.०९.२००४ व दि.२०.१०.२००४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**संवाद :**

श्री.तकीहसन खान : विषयपत्रिकेवरील सर्व विषय व ऐनवेळचे जे ही विषय असतील सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊन सर्व स.सदस्यांची सम्मती असेल तर सर्व विषय मंजूर करण्यात यावे.

**विषय क्र. ४६९/२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.बी.के.बोरूडे, उपशिक्षणाधिकारी, (निरंतर शिक्षण) यांची जिल्हा परिषद, जालना येथुन महानगरपालिका,औरंगाबाद येथे मा.कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, यांचे शासन निर्णय क्रमांक एसएटी ३३०४ / (८२६७/०४)/प्रशा-२ दि.६ऑगस्ट २००४ च्या आदेशान्वये शिक्षणाधिकारी या पदावर एक (१) वर्षाच्या कालावधीसाठी महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी,स्वीयत्तर सेवा इत्यादी) नियम १९८१ मधील नियम ४० मधील अटी व शर्ती नुसार प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यांत आल्याने दिनांक १८.०८.२००४ रोजी कार्यालयीन वेळेत शिक्षणाधिकारी पदावर रूजू झालेले आहेत.

करीता श्री.बी.के.बोरूडे, उपशिक्षणाधिकारी यांना महानगरपालिका शिक्षणाधिकारी या पदावर दिनांक १८.०८.२००४ पासून एक (१) वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने झालेल्या नियुक्तीस कार्योत्तर मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.बी.के.बोरूडे,यांची यांची औरंगाबाद महानगरपालिकेत शिक्षणाधिकारी या पदावर दि.१८.०८.२००४ पासून एक वर्षाच्या कालावधीसाठी प्रतिनियुक्तीने झालेल्या नियुक्तीस सर्वानुमते कार्योत्तर मान्यता देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७०/३ :**

सर्वसाधारण सभा दि.१९.०६.२००४ विषय क्र.३६४/३ शिफारस केल्यानूसार सदर प्रस्ताव दिनांक ०६.०८.२००४ च्या माध्यमिक, पूर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समिती समोर ठेवण्यात आला असून सदर समितीने ठराव क्र.४ अन्वये प्रस्तावातील अ.क्र.७ मध्ये प्रस्तावित कार्यवाहीचा अधिकार उप आयुक्त यांना देण्याच्या दुरूस्तीसह मंजूरी देवून सर्वसाधारण सभेपूढे ठेवण्यास शिफारस केली आहे. मुळ प्रस्ताव खालील प्रमाणे आहे.

शिक्षणाधिकारी यांनी औरंगाबाद महानगरपालिकेच्या शाळांच्या गुणवत्ता वृध्दीसाठी काही उपाय योजना व काही कृती कार्यक्रमांचा प्रस्ताव सादर केला आहे.

(१) मुख्याध्यापक व शिक्षकांनी शाळेत व वर्गात वेळेवर उपस्थित रहावे,यास्तव अनुपस्थितीची आगाऊ लेखी स्वरूपातील सूचना शिक्षकांनी व मुख्याध्यापकांनी शिक्षणाधिकारी यांना द्यावी.

(२) वर्गातील विद्यार्थांची कौटुंबिक , आर्थिक परिस्थिती संदर्भातील कार्डस शाळेत उपलब्ध असावेत.

(३) विद्यार्थ्यांना विशेष रूची असलेले विषय, शिक्षणा विषयी त्यांना वाटणारी नकारात्मकता या बद्यल प्रत्येक विद्यार्थ्यांची माहिती वर्गशिक्षकांनी येत्या महिन्याभरात संकलित करावी.

(४) शक्यतो संबंधित प्रभागाच्या नगरसेवक/नगरसेविकांच्या अध्यक्षतेखाली प्रत्येक शाळेत ''पालक शिक्षक संघांची '' स्थापना करून दर महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी त्या संघाची बैठक व्हावी. या बैठकीत शाळेची गुणवत्ता , शैक्षणिक दर्जा इ. बाबत तसेच शाळेच्या अडचणीं बाबत चर्चा व्हावी. बैठकीचे इतिवृत्त मुख्याध्यापकांनी शिक्षणाधिकारी यांचेकडे बैठकीनंतर तीन दिवसात पाठवावे.

(५) शिक्षकांनी विद्यार्थ्यांची व त्यांच्या कुटुंबियांशी जवळीक साधणारे उपक्रम राबवावेत व विद्यार्थ्यांच्या घरी होणाऱ्या कार्यक्रमांना उपस्थित रहावे. पालकांना वारंवार शाळेत बोलावून त्यांना विद्यार्थ्यांच्या प्रगतीची माहिती देणे. वर्षातून दोनदा पालकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे, शाळेत दर सप्ताहास विविध स्पर्धांचे आयोजन करणे, विद्यार्थ्यांचे आरोग्य व नीटनेटकेपणा याकडे वैयक्तिक लक्ष पुरविणे, महानगरपालिकेच्या शालेय आरोग्य कार्यक्रमांमधून आपल्या विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेवून आजारपणाबाबत नोंदी ठेवणे व उपचारासाठी उपाययोजना करणे.

६) नियमित शाळेत येणाऱ्या व विविध स्पर्धांमध्ये यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करणे, शाळेतील अनुपस्थितीची कारणे शोधून त्यांच्या पालकांशी चर्चा करून त्यात सुधारणा घडवून आणणे.

७) मुख्याध्यापक, शिक्षक/ शिक्षीका, सांस्कृतिक अधिकारी, क्रीडा अधिकारी,शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निलंबित करणेचा व दंडात्मक कार्यवाही करणेचा अधिकार शिक्षणाधिकारी यांचेकडे असावा.

८) खाजगी शाळांमधील गुणवंत शिक्षकांकडून महानगरपालिका शाळा तसेच विद्यार्थ्यांच्या वार्षिक उत्तरपत्रिकेचे मुल्यमापन करून घेणे.

९) सांस्कृतिक अधिकारी व क्रीडा अधिकारी यांनी प्राधान्याने महानगरपालिका शाळांमधून उपक्रम आयोजित करणे ही त्यांची मुळ व प्रमुख जबाबदारी असेल.

१०) शाळांमधून दर्जेदार स्नेहसंमेलन, क्रीडा स्पर्धांचे आयोजन, आधुनिक शैक्षणिक साहित्याचा वापर, प्रात्यक्षिके दाखविणे, वनस्पती,पर्यावरण संबंधी माहिती देणे, सहलींचे आयोजन, राष्ट्रीय भावना वृध्दींगत करणारे उपक्रम, शैक्षणिक पात्रतेनुसार निर्धारीत पातळीपेक्षा शैक्षणिक क्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अधिक वर्गांचे आयोजन करणे, शाळेचा परिसर स्वच्छ व सुंदर ठेवणे, मुलभूत सुविधांचा योग्य वापर करणे मुख्याध्यापकांची जबाबदारी असेल.

११) विशेष मेहनत घेणाऱ्या शिक्षक/ मुख्याध्यापकांना अतिरिक्त वेतनवाढ व प्रमाणपत्र गौरवपूर्वक दिनांक ८ डिसेंबर महानगरपालिका वर्धापन दिनी प्रदान करणे व दिनांक ५ सप्टेंबर रोजी (शिक्षक दिन) आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात येते ती प्रथा कायम ठेवावी.

१२) स्वच्छ व सुंदर शाळा योजने अंतर्गत प्रत्येक विभागातील एका शाळेस वार्षिक पारितोषिक देण्यात यावे, त्यासाठी वरील उपक्रमांचे आयोजन व इ.४ थी,इ.७ वी बोर्डाच्या परिक्षेतील यश हे निकष असावेत.

१३) जागा उपलब्ध असल्यास शाळेभोवती वृक्षारोपण करणे व झाडे किमान तीन वर्ष जगविणे ही मुख्याध्यापकांची जबाबदारी राहील. या संदर्भातील त्यांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद त्यांच्या गोपनिय अहवालात केली जावी.

(१४) दोन शाळा पर्यवेक्षक व उप शिक्षणाधिकाऱ्यांची दोन पदे मनपा मुख्याध्यापकांमधून भरण्यात यावीत.

(१५) ही पध्दत अंमलात येई पर्यंत मनपा अधिकाऱ्यांची शाळा तपासणी साठी टीम तयार करण्यात यावी.

(१६) चार स्कूल सोशल वर्कर्सची करारपध्दतीवर नियुक्ती करण्यात यावी.

(१७) शिक्षणाधिकाऱ्यांना प्रत्येक महिन्याला रूपये ५०००/- पर्यंत खर्च मंजुरीचे अधिकार प्रदान करण्यांत यावे.

(१८) मुख्याध्यापक ,शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सर्व प्रकारच्या रजा मंजुरीचे अधिकार शिक्षणाधिकारी यांना असावे.

(१९) शिक्षण विभागाचे भांडार पूर्वीप्रमाणेच शिक्षणाधिकारी यांच्या अधिपत्याखाली स्वतंत्र असावे.

(२०) सर्व शिक्षकांनी सकाळी / दुपारी शाळेच्या या वेळांचे पालन करून स्वत: प्रार्थना व राष्ट्रगीत करिता उपस्थित रहावे.

(२१) शाळेच्या वेळा मोठया अक्षरात शाळेच्या प्रवेशद्वारावर नमुद करावे.

(२२) शाळेच्या वेळेपूर्वी सेविका, चौकीदार यांनी वर्ग, परिसर, पूर्ण शाळा स्वच्छ करावी.

(२३) शाळेतील एका शिक्षकांला विद्यार्थ्यांसाठी पिण्याचे पाणी व देण्यात येणारे खाद्य (खिचडी) तपासणीची जबाबदारी द्यावी तसेच मुख्याध्यापक यांनी संबंधित शिक्षकाला तांदुळाचा हिशोब ठेवण्याचे लेखी आदेश द्यावे.

(२४) प्रार्थनेकरिता जास्तीत जास्त विद्यार्थी उपस्थित रहातील याची सर्व शिक्षकवर्ग यांनी जबाबदारी घ्यावी. जर शाळेत विद्यार्थी येत नसल्यास त्यांच्या घरी जावून पालकांना तशी विनंती करण्यात यावी. प्रार्थने नंतर कमीतकमी २० मिनिट शिक्षक व विद्यार्थी यांनी जमलेल्या विद्यार्थ्यांना कवायत, सामान्यज्ञान, दिनविशेष सुविचार, दररोज घडणाऱ्या घटनांची माहिति देण्यात यावी.

(२५) शाळेत आल्यानंतर सर्व कर्मचाऱ्यांनी हजेरी रजिस्टरवर स्वाक्षरी करावे.शिक्षण विभागात व प्रत्येक शाळेत मुख्याध्यापक /शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी मुव्हमेंट रजिस्टरवर नोंद करणे बंधनकारक राहील.

(२६) उशीरा येणाऱ्या कर्मचाऱ्यांचे वेगळे रजिस्टरमध्ये नोंद घेत जावे.

(२७) वर्गात शिक्षकांनी सर्व विद्यार्थी हे मनपाने दिलेल्या स्वच्छ गणवेशात येतील याची काळजी घ्यावी.

(२८) मध्यान्तरामध्ये विद्यार्थी शाळेतून घरी जावू नये यासाठी उपाय योजना करण्याची जबाबदारी मुख्याध्यापक यांची राहील.

(२९) प्रत्येक शिक्षकाने वर्गात दररोज उपस्थिती नोंदणी करून गोषवाऱ्यात नोंद करणे.

(३०) समर्थनिय कारणाशिवाय मुख्याध्यापक यांनी कोणत्याही विद्यार्थ्यांस शाळा सोडल्याचा दाखला देणे बाबत शिक्षणाधिकारी यांचे कडे शिफारस करू नये. तरी प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

सौ.साधना सुरडकर : अट क्र.१७ व १९ वगळण्यात यावे.

मा.महापौर : दुरूस्तीसह मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनूसार अ.क्र. ०१ ते ३० पैकी अ.क्र.१७ व १९ वगळून आणि अ.क्र.७ मध्ये प्रस्तावित कार्यवाहीचा अधिकार उपआयुक्त यांना देण्याच्या दुरूस्तीसह महानगरपालिकेच्या शाळांच्या गुणवत्ता वृध्दीसाठी उपाय योजना व कृती कार्यक्रमांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७१/४ :**

माध्यमिक, पूर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समितीने दिनांक ०६.०८.२००४ रोजी संपन्न झालेल्या समितीच्या सभेत ठराव क्र. ५ अन्वये मुख्याध्यापकांची पदाच्या संदर्भात सेवा भरती नियमांना (आर.आर.) दुरूस्ती करण्यांस मंजुरी देवून सर्वसाधारण सभेपूढे ठेवण्यास शिफारस केली आहे. मुळ प्रस्ताव खालील प्रमाणे आहे.

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका शिक्षण विभागात मुख्याध्यापकांची पदे भरतांना महानगरपालिकेच्या कर्मचारी भरती नियम (आर.आर.) मध्ये व शासन नियमात तफावत दिसून येते. शासनाच्या नियमाप्रमाणे पदोन्नती देणे योग्य असल्याने महानगरपालिका औरंगाबादचा आर.आर. मध्ये खालील प्रमाणे दुरूस्ती करून पदे भरणे इष्ट वाटते.

महानगरपालिका सेवा भरती नियम व शासन नियमाचा उल्लेख खालील प्रमाणे दर्शविण्यात येत आहे.

| पद | महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग निर्णय क्र.एएमसी-१६९३/१२१९/प्रक्र./९७/नवि-२४ मंत्रालय मुबई ३२ दि.१६ मे ९४ नुसार नियुक्तीची पध्दत मनपा औरंगाबाद करीता मान्यता असलेली. | | महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७, ३१ जुलै १९९१ पर्यंत (सुधारीत) |
|---|---|---|---|
| शिक्षण मुख्याध्यापक वेतन श्रेणी रू.५५००-९००० | १.कोणत्याही विद्या शाखेचा स्नातक.<br>२. डी.एड.<br>३. औरंगाबाद महानगरपालिकेत आधी पासून असल्यास ते खेरीज करून ३० वर्षाहून अधिक वय नसावे. | सह शिक्षक म्हणून १० वर्षाच्या अनुभवासह स्तंभ क्र.३ मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे अर्हता असलेल्या सह शिक्षकांच्या संदर्भातून पदोन्नती द्वारे नियुक्ती. | शिक्षक म्हणून पाच वर्षापेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा पूर्ण केलेल्या जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) मधील प्राथमिक शाळेतील प्रशिक्षित शिक्षकांना अध्यापकांना पदोन्नती देवून नेमणूक करण्यांत येईल. |

महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७ दिनांक ३१ जुलै १९९१ पर्यंत (सुधारीत) या शासन निर्णयाप्रमाणे आर.आर.मध्ये बदल करून मुख्याध्यापकांची पदे भरण्यास मान्यता देण्यासाठी प्रस्ताव सादर.

**<u>संवाद :</u>**

सौ.साधना सुरडकर : मुख्याध्यापक पदावर पदोन्नती देतांना शारीरीक शिक्षक,चित्रकला शिक्षक, क्राफ्ट टिचर ई. विषेश विषयांच्या शिक्षकांचा प्राधान्याने विचार करावा. सन १९९८ मध्ये चित्रकला शिक्षकास मुख्याध्यापक म्हणून नियुक्ती देण्यांत आलेली आहे. दुरूस्ती सह मंजूर करावे.

मा.महापौर : दुरूस्तीसह मंजूर करण्यांत येत आहे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या शिक्षण विभागात मुख्याध्यापकांची पदे भरतांना महानगरपालिकेच्या कर्मचारी सेवा भरती नियम (आर.आर.) मध्ये खालील प्रमाणे दुरूस्ती करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| पद | महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग निर्णय क्र.एएमसी-१६९३/१२१९/प्रक्र./९७/नवि-२४ मंत्रालय मुबई ३२ दि.१६ मे ९४ नुसार नियुक्तीची पध्दत मनपा औरंगाबाद करीता मान्यता असलेली. | | महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (सेवाप्रवेश) नियम १९६७, ३१ जुलै १९९१ पर्यंत (सुधारीत) |
|---|---|---|---|
| शिक्षण मुख्याध्यापक वेतन श्रेणी रू.५५००-९००० | १.कोणत्याही विद्या शाखेचा स्नातक.<br>२. डी.एड.<br>३. औरंगाबाद महानगरपालिकेत आधी पासून असल्यास ते खेरीज करून ३० वर्षाहून अधिक वय नसावे. | सह शिक्षक म्हणून १० वर्षाच्या अनुभवासह स्तंभ क्र.३ मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे अर्हता असलेल्या सह शिक्षकांच्या संदर्भातून पदोन्नती द्वारे नियुक्ती. | शिक्षक म्हणून पाच वर्षापेक्षा कमी नसेल इतकी अखंड सेवा पूर्ण केलेल्या जिल्हा सेवा (वर्ग तीन) (दुय्यम शैक्षणिक) मधील प्राथमिक शाळेतील प्रशिक्षित शिक्षकांना अध्यापकांना पदोन्नती देवून नेमणूक करण्यांत येईल. |

तसेच मुख्याध्यापक पदावर पदोन्नती देतांना शारीरीक शिक्षक,चित्रकला शिक्षक, क्राफ्ट टिचर ई. विषेश विषयांच्या शिक्षकांचा विचार करावा. या दुरूस्ती सह मंजूरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७२/५ :**

माध्यमिक, पूर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समितीने दिनांक ०६.०८.२००४ रोजी संपन्न झालेल्या समितीच्या सभेत ठराव क्र.६ अन्वये पर्यवेक्षकांच्या पदाच्या संदर्भात सेवा भरती नियमांना (आर.आर.) दुरूस्ती करण्यांस मंजुरी देवून सर्वसाधारण सभेपूढे ठेवण्यास शिफारस केली आहे. मुळ प्रस्ताव खालील प्रमाणे आहे.

प्रस्ताव सादर करण्यात येते की, महानगरपालिका शिक्षण विभागात पर्यवेक्षकाची पदे भरतांना महानगरपालिकेच्या कर्मचारी भरती नियम (आर.आर.) मध्ये व शासन नियमात तफ़ावत दिसून येते. शासनाच्या नियमाप्रमाणे पदोन्नती देणे योग्य असल्याने आर.आर.मध्ये योग्य दुरूस्ती करून पदे भरणे इष्ट वाटते.

खालील प्रमाणे महानगरपालिका सेवा भरती नियम व शासन नियमाचा उल्लेख दर्शविण्यात येत आहे.

| पद | महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.एएमसी-१६९३/१२१९/प्र.क्र.९७/नवि-२४, मंत्रालय,मुंबई-३२ दि.१६ मे ९४ नुसार मान्य असलेले पूर्वीचे नियम- नियुक्तीची पध्दत अस्तित्वात असलेली तरतूद- | | आता मान्य करावयाचे नविन नियम महाराष्ट्र शासन शिक्षण व सेवा योजन विभाग शासन निर्णय क्र.एमएससी/१०८३/६२२५९८/६ २१/ प्रा.शि.-३मंत्रालय,मुंबई-३२दि.१४.९.८४- नविन प्रस्तावित दुरूस्ती. |
|---|---|---|---|
| शिक्षण पर्यवेक्षक वेतन श्रेणी रू.५५००-८०००/- | १)कोणत्याही विद्या शाखेचा स्नातक<br>२) डी.एड.<br>३)औरंगाबाद महानगरपालिकेत आधिपासून सेवेत असल्यास ते खेरीज करून ३० वर्षाहून अधिक वय नसावे. | मुख्याध्यापकाचा पाच वर्षाच्या अनुभवासह स्तंभ क्र.३ मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे अर्हता असलेल्या मुख्याध्यापकाचा संवर्गातून पदोन्नती द्वारे नियुक्ती. | १) संबंधित पर्यवेक्षक पदे शिक्षण मंडळाच्या सेवेत असलेल्या प्रशिक्षित पदवीधर प्राथमिक शिक्षकामधून सेवा ज्येष्ठता एव गुणवत्ता (Seniority -Cum-Merit) या आधारे भरण्यात यावीत.<br>२) सेवेतील अपदवीधर प्राथमिक शिक्षक व शिक्षण मंडळा बाहेरील उमेदवारांचा या पदासाठी विचार करण्यात येऊ नये.<br>३) या उमेदवारांची निवड प्रचलित नियमानुसार शिक्षण मंडळाच्या कर्मचारी निवड समिती मार्फ़तच करण्यात यावी.<br>४) संबंधीत प्रशासन अधिकाऱ्यांनी प्रशिक्षित पदवीधर प्राथमिक शिक्षकांची सेवा ज्येष्ठता यादी वेळोवेळी तयार करून ती प्रसिध्द करावी. |

महाराष्ट्र शासन शिक्षण व सेवा योजन विभाग शासन निर्णय क्र.एसएससी/१०८३/६२२५९८/(६२१ प्रा.शि.३,मंत्रालय,विस्तार भवन मुंबई दि.१४.९.८४ या शासन निर्णयाप्रमाणे आर.आर.मध्ये बदल करून पर्यवेक्षकांची पदे भरण्यास मान्यता देण्यासाठी प्रस्ताव सादर.)

वरिलप्रमाणे माध्यमिक, पूर्व माध्यमिक व तांत्रिक शाळा समितीने शिफारस केलेले प्रस्ताव येत्या सर्वसाधारण सभेपूढे ठेवण्यात येत आहे. मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका शिक्षण विभागात पर्यवेक्षकाची पदे भरतांना महानगरपालिकेच्या कर्मचारी सेवा भरती नियम (आर.आर.) मध्ये खालील प्रमाणे दुरूस्ती करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| पद | महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.एएमसी-१६९३/१२१९/प्र.क्र.९७/नवि-२४, मंत्रालय,मुंबई-३२ दि.१६ मे ९४ नुसार मान्य असलेले पूर्वीचे नियम- नियुक्तीची पध्दत अस्तित्वात असलेली तरतूद- | | आता मान्य करावयाचे नविन नियम महाराष्ट्र शासन शिक्षण व सेवा योजन विभाग शासन निर्णय क्र.एमएससी/१०८३/६२२५९८/६२१/ प्रा.शि.-३मंत्रालय,मुंबई-३२दि.१४.९.८४- नविन प्रस्तावित दुरूस्ती. |
|---|---|---|---|
| शिक्षण पर्यवेक्षक वेतन श्रेणी रू.५५००-८०००/- | १)कोणत्याही विद्या शाखेचा स्नातक<br>२) डी.एड.<br>३)औरंगाबाद महानगरपालिकेत आधिपासून सेवेत असल्यास ते खेरीज करून ३० वर्षाहून अधिक वय नसावे. | मुख्याध्यापकाचा पाच वर्षाच्या अनुभवासह स्तंभ क्र.३ मध्ये उपबंधित केल्याप्रमाणे अर्हता असलेल्या मुख्याध्यापकाचा संवर्गातून पदोन्नती द्वारे नियुक्ती. | १) संबंधित पर्यवेक्षक पदे शिक्षण मंडळाच्या सेवेत असलेल्या प्रशिक्षित पदवीधर प्राथमिक शिक्षकामधून सेवा ज्येष्ठता एव गुणवत्ता (Seniority -Cum-Merit) या आधारे भरण्यात यावीत.<br>२) सेवेतील अपदवीधर प्राथमिक शिक्षक व शिक्षण मंडळा बाहेरील उमेदवारांचा या पदासाठी विचार करण्यात येऊ नये.<br>३) या उमेदवारांची निवड प्रचलित नियमानुसार शिक्षण मंडळाच्या कर्मचारी निवड समिती मार्फ़तच करण्यात यावी.<br>४) संबंधीत प्रशासन अधिकाऱ्यांनी प्रशिक्षित पदवीधर प्राथमिक शिक्षकांची सेवा ज्येष्ठता यादी वेळोवेळी तयार करून ती प्रसिध्द करावी. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७३/६ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, स.नगरसेवक श्री.नासेरखान अ.रहेमान खान कुरैशी, वॉर्ड क्रमांक ६१ यांनी दिनांक २०.०७.२००४ चे पत्रामध्ये विनंती केल्याप्रमाणे सन २००४-२००५ या अर्थ संकल्पामध्ये पान क्र.१५५ अ.क्र.७८ नुसार रंभापुरा

कॉर्नर ते देवानगरी कॉर्नर येथे नवीन जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी रूपये १,००,०००/- ची तरतूद याच विभागाचे सिल्लेखाना येथे बोअर (हातपंप) करणे साठीच्या कामावर वळविण्यास हरकत नाही. कारण या भागात जलवाहिन्या टाकण्याचे वेगळे अंदाजपत्रक मंजूरीस्तव सादर केलेले आहे.

करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अर्थ संकल्पामधील पान क्र.१५५ अ.क्र.७८ नुसार वार्ड क्र.६१ रंभापुरा कॉर्नर ते देवानगरी कॉर्नर येथे नवीन जलवाहिनी टाकणेच्या कामासाठी र.रू.१,००,०००/- ची ठेवण्यांत आलेली तरतूद सिल्लेखाना येथे बोअर (हातपंप) करणेच्या कामासाठी वळती करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७४/७ :**

उपआयुक्त,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेने मोहल्ला औरंगपुरा येथे नविन सुलभ शौच्छालय बांधले आहे. शासन निर्णय, रोजगार व स्वंयरोजगार विभाग क्रमांक रो.स्व.रो./प्र.क्र.२३७/रोस्वंरो-१, दिनांक २७.०८.२००२ व नगर विकास विभाग, शासन परिपत्रक क्र.बेरोसे-१० / २००२ / प्र.क्र.११०/ नवि-२७ / मंत्रालय, मुंबई दिनांक २३.१०. २००२ अन्वये त्याचे व्यवस्थापन Pay & Use या तत्वाखाली पाच वर्षासाठी चेअरमन दादा बावरी सुशिक्षित बेरोजगार युवक सफाई कामगार सेवा सहकारी संस्था जिल्हा औरंगाबाद यांना देखभाल करणेसाठी देणे आहे.

**अटी व शर्ती :-**

१. व्यवस्थापन करणेसाठी संबंधीत संस्थेस करारनामा करून बंधनकारक आहे.
२. संबंधीत संस्थेने लॅटरीन चार्ज ५० पैसे शुल्क आकारणे आवश्यक आहे.
३. संबंधीत संस्थेस मुत्रीसाठी कोणताही चार्ज आकारता येणार नाही.
४. संबंधीत संस्थेस अपंग व अंध व्यक्तीसाठी विनामुल्य सेवा देणे बंधनकारक आहे.
५. सुलभ शौच्छालय साफ सफाईसाठी सुपरवायझर ठेवून शौच्छालय स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी संबंधीत व्यवस्थापन संस्थेवर राहील.
६. संबंधीत संस्थेस पहिल्या दोन वर्षा पर्यंत कुठल्याही चार्ज वाढविता येणार नाही.
७. संबंधीत संस्थेस दोन वर्षाच्या कालावधी नंतर चार्ज वाढविण्यासाठी कार्यालयाची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

उपरोक्त प्रमाणे अटी शर्तीस अधिन राहुन सुलभ शौच्छालय नागरीकांच्या सोयीसाठी नाममात्र शुल्क आकारून उपलब्ध करून देण्यासाठी चेअरमन, दादा बावरी सुशिक्षित बेरोजगार युवक सफाई कामगार सेवा सहकारी संस्था, जि.औरंगाबाद यांना पाच वर्षासाठी सुलभ शौच्छालय व्यवस्थापनासाठी देणेस्तव प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शासन निर्णयाच्या अनुषंगाने प्रस्तावित १ ते ७ अटिस अधिन राहून मोहल्ला औरंगपूरा येथील नविन सुलभ शौच्छालय नागरीकांच्या सोयीसाठी नाममात्र शुल्क आकारून चेअरमन दादा बावरी सुशिक्षित बेरोजगार युवक सफाई कामगार सेवा सहकारी संस्था जिल्हा औरंगाबाद यांना ५ वर्षासाठी सुलभ शौच्छालय व्यवस्थापनासाठी देणेस्तव सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७५/८ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला की, हिमायत बाग व गायमुख येथे पाणी पुरवठा करण्यासाठी हरसिध्दी सोसायटी येथील जलकुंभ ते हर्सूल कारागृहा लगतच्या जलकुंभा पर्यंत २५० मी.मी. व्यासाची जी.आय.जलवाहीनी टाकावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागाची सन २००४-२००५ च्या दरसूची नूसार रक्कम रू.२१,६०,०००/- एवढ्याचे अंदाजपत्रक

तयार करण्यांत आलेले आहे. सदर कामाचा खर्च हा भांडवली कामे ह्या लेखा शिर्षकामधून करण्यांत येणार आहे.

करीता कामाचे अंदाजपत्रक रक्कम रू.२१,६०,०००/- चे विचारार्थ तथा मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हिमायत बाग व गायमुख येथे पाणी पुरवठा करण्यासाठी हरसिध्दी सोसायटी येथील जलकुंभ ते हर्सूल कारागृहा लगतच्या जलकुंभा पर्यंत २५० मी.मी. व्यासाची जी.आय.जलवाहीनी टाकावयाच्या र.रू.२१,६०,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७६/९ :**

कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) प्रस्ताव सादर करीत आहेत की, सध्या टि.व्ही.सेंटर ते सत्यविष्णु रूग्णालय एन-१२ पर्यंत २०० मीमी व्यासाची सी.आय. जलवाहीनी आहे व त्यापूढे सत्यविष्णु रूग्णालयापासून दिल्ली गेट सोसायट्या पर्यंत २५० मी.मी. व्यासाची सी.आय.जलवाहीनी आहे. सदरील जलवाहीनीवरून सध्या एन-१२ / डी सेक्टर, सी.डी. सेक्टर, एन-१२/एच, एन-१२ स्वंतत्र भुंखड, एन-१२ अलमीन सोसायटी, एकता कॉलनी, प्रोफेसर कॉलनी, मयुरबन सोसायटी, बँक ऑफ हैद्राबाद कॉलनी इ. भागास सात टप्प्यामध्ये पाणी पुरवठा करण्यांत येतो. त्यासाठी एकुण सात तासाचा कालावधी लागतो, त्याच बरोबर एकता कॉलनी प्रोफेसर कॉलनी,बँक कॉलनी, अलमीन सोसायटी व स्वंतत्र भुखंड यांना कमी दाबाने पाणी मिळते व पुरेसे पाणी मिळत नाही. करीता टी.व्ही.सेंटर चौक ते सत्यविष्णु रूग्णालया पर्यंत २५० मी मी व्यासाची डी.आय. जलवाहीनी टाकण्याचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून सदरील कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.२०,६२,४५८=०० असून सदरील अंदाजपत्रक हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे दरसूची २००४-२००५ अन्वये तयार करण्यांत आले असून त्यास मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव ठेवण्यासाठी मा.आयुक्त यांची शिफारस आहे. सदरील काम झाल्यास एन-१२ एकता कॉलनी, प्रोफेसर कॉलनी, बँक कॉलनी, अलमीन सोसायटी इ.भागास स्वंतत्र जलवाहीनी होणार आहे. सदरील कामाचे खर्चासाठी अर्थसंकल्प २००४-२००५ मध्ये तरतुद करण्यांत आलेली आहे. करीता अंदाजपत्रक मान्यतेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपूढे मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, टी.व्ही.सेंटर चौक ते सत्यविष्णु रूग्णालया पर्यंत २५० मी मी व्यासाची डी.आय. जलवाहीनी टाकण्याचे रक्कम रू.२०,६२,४५८=०० च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७७/१० :**

नगर सचिव प्रस्ताव सादर करीत आहेत की, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था मुंबई यांनी दिनांक ७ ते ९ डिसेंबर २००४ या काळातील महाबळेश्वर येथे महिला पालिका सदस्यांसाठी आणि दिनांक१५ ते १७ डिसेंबर २००४ या काळातील माऊंट आबु येथे आयोजित विशेष प्रशिक्षणासाठी औरंगाबाद महापालिकेतर्फे मा.महापौर, मा.पदाधिकारी व पालिका सदस्य यांचा सहभाग नोंदविण्यास दिनांक १८.१०.२००४ आणि दिनांक १९.१०.२००४ चे पत्राद्वारे विनंती केली आहे.

महाबळेश्वर आणि माऊंट आबु येथे आयोजित प्रशिक्षणासाठी प्रवेश फी, प्रवास खर्च, निवास व भोजन व्यवस्था यासाठी येणारा संभाव्य खर्च महापालिकेतर्फे करावा लागणार आहे. सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात कर्मचारी/पालिका सदस्य व पदाधिकारी या लेखा शिर्षकात रू.५ लाख तरतूद करण्यांत आली आहे.

महाबळेश्वर येथील प्रशिक्षणाचा कालावधी हा महापालिका वर्धापन दिनी येतो त्यामूळे त्याचा विचार न करता माऊंट आबु येथील प्रशिक्षणाचा विचार करणे उचित होईल असे प्रशासनाने मत व्यक्त

केले आहे. त्यानुसार माऊंट आबु येथील प्रशिक्षणासाठी ५ प्रतिनिधी पाठविण्यांस आणि त्यासाठीच्या संभाव्य खर्चाचे मंजूरीस्तव प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे सादर.

**संवाद :**

सौ.निखत परविन : विषय क्र.१० च्या संदर्भात मा.महापौर यांनाच सभागृहातर्फे अधिकार देण्यात येत आहे. त्यांनी निर्णय घ्यावा.

श्री.किशनचंद तनवाणी : या प्रशिक्षणासाठी ज्या सदस्यांना पाठवावयाचे आहे त्याचे अधिकार मा.महापौर यांना देण्यांत यावे.

मा.महापौर : दुरूस्तीसह प्रस्ताव मंजूर करण्यांत येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था मुंबई यांनी दिनांक १५ ते १७ डिसेबंर २००४ या काळात माऊंट आबु येथे आयोजित विशेष प्रशिक्षणासाठी औरंगाबाद महापालिकेतर्फे पालिका सदस्यांचा सहभाग नोंदविण्यास तसेच या प्रशिक्षणासाठी येणारा संभाव्य खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, उक्त प्रशिक्षणासाठी पालिका सदस्यांची नांवे निश्चित करण्याचे सर्व अधिकार मा.महापौर यांना देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७८/११ :**

नगर सचिव प्रस्ताव सादर करीत आहेत की, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था मुंबई आणि भारतीय लोक प्रशासन संस्था दिल्ली यांचे मार्फत मा.पदाधिकारी व लोकप्रतिनिधी करिता विविध प्रशिक्षण सत्र आयोजित केले जातात. अशा प्रशिक्षण सत्रात लोकप्रतिनिधीचा सहभाग नोंदविण्यासाठी अर्थसंकल्पातही तरतूद केलेले असते. या प्रत्येक प्रशिक्षण वर्गासाठी सर्वसाधारण सभेची मंजूरी होऊन प्रशिक्षणार्थीचा सहभाग नोंदवावा लागतो. प्रसंगी सर्वसाधारण सभेच्या आयोजनापूर्वीच प्रशिक्षण सत्राची तारीख असते. सबब प्रत्येक वेळी प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे ठेवणे ऐवजी मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली सभागृहनेता व विरोधी पक्षनेता यांची समिती गठीत करून या समितीस पदाधिकारी व कोणकोणते लोक प्रतिनिधींना पाठवणे व त्यांचे सोबत अधिकारी/कर्मचारी पाठवणे आवश्यक असल्यास ते ठरविणे ई. अधिकार प्रदान करणेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था मुंबई आणि भारतीय लोक प्रशासन संस्था दिल्ली यांचे मार्फत मा.पदाधिकारी व लोकप्रतिनिधी करिता विविध प्रशिक्षण सत्र आयोजित केले जातात. अशा प्रशिक्षण सत्रात लोकप्रतिनिधीचा सहभाग नोंदविण्यासाठी अर्थसंकल्पातही तरतूद केलेले असते. या प्रत्येक प्रशिक्षण वर्गासाठी सर्वसाधारण सभेची मंजूरी होऊन प्रशिक्षणार्थीचा सहभाग नोंदवावा लागतो. प्रसंगी सर्वसाधारण सभेच्या आयोजनापूर्वीच प्रशिक्षण सत्राची तारीख असते. सबब प्रत्येक वेळी प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे ठेवणे ऐवजी मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली सभागृहनेता व विरोधी पक्षनेता यांची समिती गठीत करून या समितीस पदाधिकारी व कोणकोणते लोक प्रतिनिधींना पाठवणे व त्यांचे सोबत अधिकारी/कर्मचारी पाठवणे आवश्यक असल्यास ते ठरविणे ई. अधिकार प्रदान करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## पुरवणी विषय

**विषय क्र. ४७९/१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, आपल्या महानगरपालिकेची प्राथमिक शाळा जुब्ली पार्क येथील विद्यार्थी मोहमंद ईस्माइल (राहणार आसेफिया कॉलनी) ह्याचा मृत्यु शाळेला लागून असलेल्या झाडाची फांदी त्याच्या डोक्यावर पडल्याने मृत्यु झालेला आहे.

सदर विद्यार्थ्याच्या कुटूंबियांना मनपा तर्फे आर्थिक मदत रक्कम रूपये २५,०००/- देण्यासाठी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.मिर हिदायत अली, श्री.अविनाश कुमावत

अनुमोदक : १. सौ.शाहीन जफर महमुद जफर, २.श्री.किशनचंद तनवाणी ३. श्री.तकीहसन खान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेची प्राथमिक शाळा जुब्ली पार्क येथील विद्यार्थी मोहमंद ईस्माइल (राहणार आसेफिया कॉलनी) ह्याचा अपघाती मृत्यु झालेला असल्यामूळे सदर विद्यार्थ्याच्या कुटूंबियांना मनपा तर्फे आर्थिक मदत रक्कम रूपये २५,०००/- देण्यास सर्वानूमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८०/२ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, माझ्या वार्डातील मनपा प्राथमिक शाळा गणेश कॉलनी या शाळेच्या गच्चीवरून पडल्याने तेथील मुलगा सय्यद सत्तार हाश्मी स.रसुल हाश्मी रा.आलमगीर कॉलनी यांचा मृत्यु झालेला आहे. संबंधिताच्या कुटूंबास सहानुभूतीपूर्वक आर्थिक मदत रक्कम रूपये २५०००/- करण्यास प्रस्ताव सर्वसाधारण सभेत मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.मोहमंद जावेद कुरैशी, श्री.किशनचंद तनवाणी

अनुमोदक : १. श्री.मिर हिदायत अली, २. श्री.अविनाश कुमावत

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका प्राथमिक शाळा गणेश कॉलनी या शाळेतील विद्यार्थी सय्यद सत्तार हाश्मी स.रसुल हाश्मी रा.आलमगीर कॉलनी यांचा अपघाती मृत्यु झालेला असल्यामूळे त्यांच्या कुटूंबास आर्थिक मदत रक्कम रूपये २५०००/- देणेस सर्वानूमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८१/३ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, नुकताच संपलेल्या पावसाळ्याच्या पाण्यामूळे मोहल्ला रोहीला गल्ली येथील नाल्यात सय्यद नदीम स.अब्दुल हमीद हा बालक बूडून मृत्यू पावला आहे.

सदरील बालकाच्या कुटूंबियांना महानगरपालिकेतर्फे आर्थिक मदत रक्कम रूपये २५०००/- देण्यासाठी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.मिर हिदायत अली, श्री.किशनचंद तनवाणी

अनुमोदक : १. सौ.शाहीन जफर महमुद जफर २. श्री.अविनाश कुमावत ३. श्री.तकीहसन खान

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पावसाळ्याच्या पाण्यामूळे मोहल्ला रोहीला गल्ली येथील नाल्यात सय्यद नदीम स.अब्दुल हमीद हा बालक बूडून अपघाती मृत्यू पावला असल्यामूळे सदरील बालकाच्या कुटूंबियांना महानगरपालिकेतर्फे आर्थिक मदत रक्कम रूपये २५०००/- देणेस सर्वानूमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८२/४ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, भिमनगर भावसिंगपूरा या ठिकाणी मनपातर्फे बांधण्यात आलेल्या दवाखान्यास डॉ.सविता उर्फ माईसाहेब आंबेडकर यांचे नांव देण्यांत यावे, करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.गणेश तांबे अनुमोदक : श्री.नंदकुमार फुलारी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भिमनगर भावसिंगपूरा या ठिकाणी महापालिकेतर्फे बांधण्यात आलेल्या दवाखान्यास डॉ.सविता उर्फ माईसाहेब आंबेडकर यांचे नांव देणेस सर्वानूमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८३/५ :**

नगर सचिव विभागातर्फे सर्वसाधारण सभा, स्थायी समिती सभा, विशेष समित्याच्या सभा, पदाधिकारी यांच्या निवडणूका त्यांचे कडील कामे व / पालिका सदस्य यांचे अभ्यास दौरे या कामा बरोबरच प्रशासकीय कामे केली जातात. महाराष्ट्रात पुणे, कल्याण डोंबिवली, पिंप्री चिंचवड,नाशिक व इतर महानगरपालिकेत त्यांना मदतीसाठी उप नगर सचिव, कार्यालय अधिक्षक ही पदे आहेत. आगामी सार्वत्रिक निवडणूकीनंतर पालिका सदस्यांची संख्या वाढणार आहे. पर्यायाने नगर सचिव विभागाचे कामात आणखी वाढ होणार आहे. या सर्व बाबींचा विचार करता नगर सचिव विभागात सध्या कार्यरत असलेला कर्मचारी वृंद अपुरा पडत आहे. या विभागाचे सक्षमीकरण करण्याच्या दृष्टीकोनातून उपनगरसचिव चे एक पद व कार्यालय अधिक्षक यांची ०२ पदे निर्माण करणे आवश्यक आहे. शैक्षणिक अर्हता व अनुभव व नियुक्तीची पध्दत याचा तपशिल खालिल प्रमाणे.

| अ.क्र. | पदनाम<br>वेतनश्रेणी | अर्हता | नियुक्ती | पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ०१. | उपनगरसचिव<br>७४५०-११५०० | **१.**कोणत्याहीशाखेचा स्नातक<br>**२.** विधी पदवीधर<br>**३.** कार्यालय अधिक्षक किंवा तत्समवेतनश्रेणीतील प्रशासकीय कामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव | अ- प्रतिनियुक्तीने<br>शासकीय सेवेतील तहसिलदार प्रवर्गातील व्यक्तीची प्रतिनियुक्तीद्वारे नियुक्ती<br>किंवा<br>ब - नामनिर्देशनाने<br>१. महापालिका सेवत नसतील तर ३० वर्षाहून अधिक वय नसावे.<br>२. स्तंभ ३ मध्ये दर्शविलेली अर्हता व अनुभव धरून<br>क - पदोन्नतीने<br>- स्तंभ ३ मधील शैक्षणिक अर्हता व अनुभव असलेल्या कार्यालयीन अधिक्षक संवर्गातील पदोन्नतीने | एक |
| ०२. | कार्यालय अधिक्षक/<br>समिती अधिक्षक<br>५५००-९००० | महापालिका शासन मंजूर सेवा भरती नियमा नुसार | महापालिका शासन मंजूर सेवा भरती नियमानूसार आणि विधी शाखेच्या स्नातकास प्राधान्य. | दोन |

वरील प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर .

सुचक :- ०१. किशनचंद तनवाणी, ०२. नंदकुमार घोडेले, ०३.श्री.नंदकुमार फुलारी

अनुमोदक :- ०१. मिर हिदायत अली, ०२. सौ.साधना सुरडकर

**संवाद :**

श्री.मिर हिदायत अली : विषय क्र.५ मध्ये दुरूस्ती करावयाची आहे. अ.क्र.१ उप नगरसचिव या पदाचे नियुक्ती स्तंभ क्र.४ मध्ये अ- प्रतिनियुक्तीने शासकीय सेवेतील तहसिलदार प्रवर्गातील व्यक्तीची प्रतिनियुक्तीद्वारे नियुक्ती हे वगळण्यात यावे.

श्री.नंदकुमार घोडेले : स्तंभ क्र.३ अर्हता या रकान्यातील अ.क्र.२ व ३ वगळण्यात यावे. व त्याऐवजी महानगरपालिकेतील प्रशासकीय सेवेचा किमान २० वर्षाचा अनुभव असावा. अशी दुरूस्ती करावी. व कार्यालय अधिक्षक याला विधी पदवीधर वगळावे. हे ५० : ५० प्रमाणे भरावे. १५ वर्षाचा अनुभव असावा.

श्री.रतनकुमार पंडागळे : सदर प्रस्तावात लघुटंकलेखक ची ०२ पदे व वरीष्ठ लिपिकाचे ०१ पद निर्माण करणे बाबत दुरूस्ती करण्यात यावी.

श्री.किशनचंद तनवाणी : विषय क्र.५ हा दुरूस्तीसह मंजूर करण्यात यावा.

श्री.स.अली सलामी : सर्व विषय मंजूर करावे. विषय क्र.५ मध्ये काय दुरूस्ती असेल ती करून घ्यावी.

मा.महापौर : दुरूस्तीसह मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे व सभागृहात झालेल्या चर्चेनूसार नगर सचिव विभागासाठी खालील पदे निर्माण करण्यास व त्यांची शैक्षणिक अर्हता व अनुभव व नियुक्तीची पध्दत खालील प्रमाणे ठेवण्यांस दुरूस्तीसह सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

| अ.क्र. | पदनाम वेतनश्रेणी | अर्हता | नियुक्ती | पद संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ०१. | उपनगरसचिव ७४५०-११५०० | **१.**कोणत्याहीशाखेचा स्नातक **२.** प्रशासकीय मनपा सेवेचा सतत २० वर्षे कामाचा अनुभव. | अ - नामनिर्देशनाने<br>१. महापालिका कर्मचाऱ्यामधून<br>२. स्तंभ ३ मध्ये दर्शविलेली अर्हता व अनुभव धरून | एक |
| ०२. | कार्यालय अधिक्षक/ समिती अधिक्षक ५५००-९००० | कोणत्याही शाखेचा स्नातक महानगरपालिकेतील प्रशासकीय सेवेचा १५ वर्षाचा अनुभव. | ५० टक्के नामनिर्देशनाने व ५०टक्के पदोन्नतीने महापालिका शासन मंजूर सेवा भरती नियमानूसार | दोन |
| ०३. | वरीष्ठ लिपीक ४५००-७००० | महापालिका शासन मंजूर सेवा भरती नियमा नुसार | नामनिर्देशनाने किंवा कनिष्ट लिपीक म्हणून किमान ५ वर्षाचा अनुभव असणाऱ्या कनिष्ठ लिपीका मधुन पदोन्नतीने. | एक |
| ०४. | लघुटंकलेखक ४५००-७००० | महापालिका शासन मंजूर सेवा भरती नियमा नुसार | महापालिका शासन मंजूर सेवा भरती नियमा नुसार | दोन |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८४/६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की,दिपावली व इद हे सण एकाच वेळी येत आहे. मागील वर्षी ईद व दिपावली मिलन हा उपक्रम महानगरपालिकेतर्फे राबविण्यात आला होता, व सांस्कृतिक कार्यक्रमाचे देखील आयोजन करण्यात आले होते.त्याच धर्तीवर या वर्षी देखील दिपावली व रमजान ईद हे सण लगत येत आहे. एक सामाजिक उपक्रम व राष्ट्रीय एकात्मता वृध्दीसाठी असे कार्यक्रम उपयोगी ठरतात सबब दिपावली व ईद मिलनाचा एकत्र कार्यक्रम ठेवणे व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे इत्यादी साठी आकस्मीक खर्च या लेखाशिर्षातून खर्च करणेस व येणाऱ्या संभाव्य खर्चास मान्यता देणेसाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे ठेवणे योग्य.

सुचक : श्री.किशनचंद तनवाणी, श्री.मिर हिदायत अली

अनुमोदक : श्री.नंदकुमार घोडेले, सौ.साधना सुरडकर, श्री.नंदकुमार फुलारी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिपावली व ईद मिलनाचा एकत्र कार्यक्रम ठेवणेस व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणेस व सदरील खर्च हा आकस्मीक खर्च या लेखाशिर्षातून करणे करीता येणाऱ्या संभाव्य खर्चास सर्वानूमते मान्यता देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८५/७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,माझ्या वार्डातील कैसर कॉलनी मनपा उर्दू लायब्ररी हि खूप नावाजलेली असून ती मनपाची सर्वात मोठी उर्दू लायब्ररी आहे. तसेच या लायब्ररीस आजपर्यंत कोणतेच नांव नाही.

तरी आपण या ऐतिहासिक औरंगाबाद शहरातील प्रसिध्द कवि ‘‘ श्री.अख्तर उझ झमा नासेर ‘‘ यांचे नांव या उर्दू लायब्ररीस द्यावे, करीता हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे मंजूरीस्तव सादर करण्यांत येते.

सुचक : श्री.सलिम पटेल अनुमोदक : श्री.मिर हिदायत अली

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कैसर कॉलनी महापालिका उर्दू लायब्ररीस ऐतिहासिक औरंगाबाद शहरातील प्रसिध्द कवि ‘‘ श्री.अख्तर उझ झमा नासेर ‘‘ यांचे नांव देणेस सर्वानूमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८६/८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रभाग क्र.५२ साईनगर येथील जूना साईनगर रस्त्याचे पुन:डांबरीकरण करणे करीता आर्थिक तरतूद ५ लक्ष ऐवढी करण्यांत आलेली आहे. १.२० हजाराचे अंदाजपत्रक मंजूर केलेले आहे. उर्वरीत रस्त्याचे कामासाठी ३.४ लक्ष पर्यंतचे अंदाजपत्रक तयार करून हे काम या वर्षाच्या विकास कामाच्या होणाऱ्या बचती मधून करण्यासाठी प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.सुरजितसिंग खुंगर

अनुमोदक : ०१. श्री.नंदकुमार घोडेले, ०२.श्री.किशनचंद तनवाणी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.५२ साईनगर येथील जूना साईनगर रस्त्याचे पुन:डांबरीकरण करणे करीता आर्थिक तरतूद ५ लक्ष ऐवढी करण्यांत आलेली आहे. १.२० हजाराचे अंदाजपत्रक मंजूर केलेले असल्यामूळे उर्वरीत रस्त्याचे कामासाठी ३.४ लक्ष पर्यंतचे अंदाजपत्रक तयार करणे व हे काम या वर्षाच्या विकास कामाच्या होणाऱ्या बचती मधून करणेस सर्वानूमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**चर्चा :**

श्री.स.अली सलामी : नाला सफाई बाबत जो इंजिनिअरींग कॉलेजकडून रिपोर्ट मागविलेला आहे, तो पूढील बैठकीत सादर करण्याचे आदेशीत करण्यात यावे.

श्रीमती लिलावती घायतिलक : विषयपत्रिका मंजूर करण्यापूर्वी वार्डातील ज्या समस्या निर्माण होत आहे, त्याबाबतच्या सूचना ऐकूण घ्याव्यात तसे आदेश प्रशासनास द्यावे. माझ्या वार्डात अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत.(स.सदस्या श्रीमती घायतिलक मा.महापौर डायस समोर जाऊन मोठमोठ्याने बोलतात.)

मा.महापौर : मुळ विषय पत्रिकेवरील दुरूस्तीसह सर्व प्रस्ताव मंजूर करण्यात आलेले आहे. तसेच ऐनवेळचे काही प्रस्ताव आलेले आहेत.

श्री.संजय शिरसाट : ऐनवेळी कोणते विषय आलेले आहेत ते सभागृहात वाचून दाखववावे.

नगर सचिव : प्रशासनाचे काही विषय आहे. यात झोन क्र.४ च्या विभाजन करण्याचा प्रस्ताव आहे. तसेच स.सदस्यांचे बरेच प्रस्ताव आहेत, त्यात कोकणवाडी येथील खाजगी संस्थेस शाळेसाठी दिलेली जागा रद्द करण्याचा विषय आहे.

श्रीमती लिलावती घायतिलक : माझ्या वार्डातील समस्या सोडविण्याबाबत अधिकाऱ्यांना आदेशीत करावे.

मा.महापौर : स.सदस्या श्रीमती घायतिलक यांचे वार्डातील समस्या बाबत श्री.सोनवणे साहेब यांनी पाहणी करून कार्यवाही करावी.

श्री.तकीहसन खान : सर्व विषय मंजूर करावे. मंजूर विषयाची अमंलबजावणी करण्याचे प्रशासनास आदेशीत करावे.

मा.महापौर : ऐनवेळी सादर झालेले सर्व विषय मंजूर करण्यात येत आहे.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ४८७/१ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, विभाग क्र.४ चा भाग भौगोलिकदृष्ट्या व लोकसंख्येच्या मानाने मोठा असून या भागातील साफसफाई,वसुली,पाणीपट्टी,आरोग्य व स्वच्छतेची कामे यावर नियंत्रण ठेवण्यात अडचणी निर्माण होत असल्याने या विभागाचे विभाजन दोन विभागात करण्यांत यावे असा ठराव सर्वसाधारण सभा ठराव क्र.११९/३ दिनांक २०.०८.२००३ अन्वये पारीत झालेला आहे.

उक्त सर्वसाधारण सभेच्या ठरावाच्या अनुषंगाने सादर करण्यांत येते की, विभाग क्र.४ चे सध्याचे क्षेत्रफळ १४ चौ.कि.मी.असून या विभागात एकूण २९,३६१ मालमत्ता आहेत. भौगोलिकदृष्ट्या साफसफाई,आरोग्य पाणी पुरवठा,जलनि:सारण आदि बाबींवर योग्य प्रकारे नियंत्रण ठेवले जावे यासाठी विभाग क्र.४ चे विभाजन खालील प्रमाणे करण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर करण्यांत येत आहे.

विभाग क्र.४ मधील खालील भाग विभाग क्र.२ मध्ये समाविष्ठ करणे.

समता नगर,सिल्लेखाना,सन्मित्र कॉलनी (सिटीझन प्रेस),रॉक्सी टॉकिज,भाग्यनगर, चिंतामणी कॉलनी,विवेकानंद कॉलेज,क्रांतीचौक पोलीस स्टेशन कॉलनी,कोटला कॉलनी,निराला बाजार

विभाग क्र.४ मधील खालील भाग विभाग क्र.३ मध्ये समाविष्ठ करणे.

नुतन कॉलनी,अजबनगर,शिवाजी हायस्कुल,शासकीय दुग्ध कार्यालय,खोकडपूरा (पांडूरंग कॉलनी, फुले कॉलनी), बडा तकीया,छोटा तकीया,सब्जीमंडी,टेलिफोन ऑफिस.

उर्वरीत भागापैकी विभाग क्र.४ चे विभाजन वि.क्र.४ व ९ मध्ये नैसर्गिक सिमा रेषा लक्षात घेता खालील प्रमाणे करण्याचे प्रस्तावित आहे.

विभाजना नंतर विभाग क्र.४ मध्ये अंदाजित १४,३६१ मालमत्ता राहतील.

विभाग क्र.४ मध्ये येणारे प्रमुख भाग :- रमा नगर,रामानंद कॉलनी,उस्मानपुरा,भिमपुरा, ज्योतीनगर,तजमुल ले आऊट भागश:, श्रेयनगर,न्यु श्रेयनगर, संत एकनाथ नाट्य मंदिर परिसर, झांबड इस्टेट, दशमेश नगर,बिजली नगर,राठी कॉर्नर, जबिंदा ले आऊट,चौसर नगर, म्हाडा कॉलनी, प्रतापनगर,संजय को.ऑ.हौ.सो.,एकनाथ नगर इत्यादी.

विभाग क्र.४ च्या चतु:सिमा खालील प्रमाणे राहतील.

उत्तर - जालना रोड-अमरप्रित हॉटेल ते चुन्नीलाल आसाराम पेट्रोल पंपाच्या पुर्वेकडील रस्ता.

दक्षिण - औरंगाबाद चिकलठाणा रेल्वे लाईन (शहानुर मियाँ क्रॉसींग गेट ते तरूण भारत दैनिकाचे रेल्वे क्रॉसींग गेट पर्यंत)

पूर्व - हॉटेल अमरप्रित ते शहानुरमियाँ दर्गा रेल्वे क्रॉसींग गेट पर्यंतचा ३० मी.रूंद रस्ता.

पश्चिम - चुन्नीलाल आसाराम पेट्रोल पंपाच्या पूर्वेकडील रस्ता ते रेल्वे पटरी (नागसेन वन विद्यालयाच्या पूर्व बाजूचा रस्ता)

प्रस्तावित विभाग क्र.९ मध्ये अंदाजित १४,३६१ मालमत्ता राहतील.

प्रस्तावित विभाग क्र.९ मध्ये येणारे प्रमुख भाग - शिवाजी सिंधी कॉलनी, आकाशवाणी परिसर, शिवशंकर कॉलनी,भानुदास नगर,उत्तम नगर,जय विश्व भारती कॉलनी, टिळक नगर, जवाहर कॉलनी, डॉ.हेडगेवार रूग्णालय, गजानन महाराज मंदिर परिसर, अलंकार कॉलनी, संदेश कॉलनी, इसाक नगर, लक्ष्मी नगर,शिवराज कॉलनी, मयुरबन कॉलनी,राजनगर, गादीया विहार, स्वानंद नगर, इंदिरा नगर गारखेडा, सह्याद्री नगर, ज्ञानेश्वर नगर इत्यादी.

प्रस्तावित विभाग क्र.९ च्या चतु:सिमा खालील प्रमाणे राहतील.

उत्तर - जालना रोड-हॉटेल अमरप्रित ते हायकोर्ट इमारत

दक्षिण - विद्यमान रेल्वे पटरी, सिडको भाग,सिडको डी नोटी फाईड भाग

पूर्व - विभाग क्र.४ ची हद्द-हायकोर्ट इमारत ते शिवाजी नगर

पश्चिम - हॉटेल अमरप्रित ते शहानुरमियाँ दर्गा रेल्वे क्रॉसींग गेट ३० मी.रूंद रस्ता.

नव्याने अस्तित्वात येणाऱ्या विभाग क्र.९ चे कार्यालय तात्पुरती व्यवस्था म्हणून उल्कानगरी मधील मालखरे अपार्टमेंट येथे ठेवण्यांत येईल, जे विभागाच्या मध्यवस्तीत राहणार असल्याने नागरीकांना विभागीय कार्यालयात जाणे-येणे सोईचे होईल. विभाग क्र.४ चे कार्यालय सध्या असलेल्या ठिकाणीच ठेवण्यात येईल.

विभाग क्र.४ मधील जे मजूर प्रस्तावित विभाग क्र.९ च्या भागात काम करत आहेत त्यांना विभाग क्र.९ कडे हस्तांतरीत करण्यांत येईल. तथापी या विभागासाठी खालील प्रमाणे संवर्ग निहाय पदे निर्माण करणे आवश्यक आहे.

| पदनाम | पद संख्या | पदाची वेतनश्रेणी |
|---|---|---|
| विभागीय अधिकारी | १ | ७४५०-११५०० |
| सहाय्यक विभागीय अधिकारी | १ | ५५००-९००० |
| कार्यालय अधिक्षक | १ | ५५००-९००० |
| कर निरीक्षक | ३ | ४५००-७००० |
| ज्येष्ठ स्वच्छता निरीक्षक | १ | ५५००-९००० |
| स्वच्छता निरीक्षक | ३ | ४५००-७००० |
| कनिष्ठ लिपिक | ७ | ३०५०-४५९० |
| रोखपाल | १ | ३०५०-४५९० |
| वाहन चालक | ३ | ३०५०-४५९० |
| शिपाई | ८ | २५५०-३२०० |

उपरोक्त पदांच्या निर्मितीमुळे आस्थापनेवर रू.२४.०६ लाख एवढा वार्षिक खर्च होणार आहे. त्यामुळे आस्थापनेवरील खर्चाची टक्केवारी ०.१५ ने वाढणार आहे.

प्रस्तावित विभाग क्र.४ च्या विभाजनास व विभाग क्र.९ साठी उक्त प्रमाणे संवर्ग निहाय पदांना मंजूरी देण्यासाठी प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्यानुसार,विभाग क्र.४ चे विभाजन विभाग क्र.४ व ९ मध्ये करण्यांस मंजूरी देण्यात येते, तसेच प्रस्तावित विभाग क्र.९ साठी खालील प्रमाणे विविध संवर्गातील पदे निर्माण करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

| पदनाम | पद संख्या | पदाची वेतनश्रेणी |
|---|---|---|
| विभागीय अधिकारी | १ | ७४५०-११५०० |
| सहाय्यक विभागीय अधिकारी | १ | ५५००-९००० |
| कार्यालय अधिक्षक | १ | ५५००-९००० |
| कर निरीक्षक | ३ | ४५००-७००० |
| ज्येष्ठ स्वच्छता निरीक्षक | १ | ५५००-९००० |
| स्वच्छता निरीक्षक | ३ | ४५००-७००० |
| कनिष्ठ लिपिक | ७ | ३०५०-४५९० |
| रोखपाल | १ | ३०५०-४५९० |
| वाहन चालक | ३ | ३०५०-४५९० |
| शिपाई | ८ | २५५०-३२०० |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८८/२ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजना ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाने दिनांक ०१.०४.१९९८ पासुन महानगरपालिका औरंगाबाद कडे हस्तांतरीत केली आहे. योजने सोबत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे दोन अभियंते व चार शाखा अभियंते महानगरपालिकेकडे प्रतिनियुक्तीवर आले होते, त्यापैकी श्री.सु.रा.फडणीस, उप अभियंता हे सेवा निवृत्त झाल्यावर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने श्री.जी.बी.जावळे यांना उप अभियंता पदोन्नत करून त्यांची सेवा महानगरपालिकेत चालू ठेवण्यात आली. श्री.जी.बी.जावळे नियम वयोमानानुसार दिनांक ३०.०९.२००४ रोजी सेवा निवृत्त झाले आहेत. श्री.जी.बी.जावळे यांच्या सेवा निवृत्ती नंतर श्री.के.एम.फालक (सहाय्यक अभियंता) यांना उप अभियंता पदाचा जायकवाडी उद्‌भव उप विभागाचा अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे.

महानगरपालिके तर्फे रूपये (१) ६७.३० कोटी किमंतीची टप्पे निहाय योजना राबविण्याचे काम. (२) रोजाबाग येथे २.०० द.ल.ली.क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्राची उभारणी करणे. (३)औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजना, पाणी व उर्जा परिक्षणाचे काम करणे. (४) सिक्लोर मॅक पध्दतीने मिठाचे द्रावणापासून सोडीयम हायपोक्लोराईट तयार करणे व क्लोरीनेशन करणे. (५)फारोळा जलशूध्दीकरण केंद्राची क्षमता वाढविणे आदी महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घ्यावयाचे आहेत. हे प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण करण्यासाठी श्री.जी.बी.जावळे यांच्या अनुभवाचा उपयोग होवू शकतो. कारण या बाबत त्यांचा अनुभव औरंगाबाद पाणी पुरवठा योजना कार्यान्वित झाल्यापासूनचा आहे व योजना महानगरपालिकेकडे हस्तांतरीत झाल्यापासून ते सेवा निवृत्ती पर्यंत श्री.जावळे या योजनेवर कार्यरत होते. म्हणून त्यांना एक वर्षाच्या कालावधीसाठी मानधनावर महानगरपालिका सेवेत तांत्रिक सल्लागार म्हणून घेण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक १९.०८.२००४ रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समिती सभेत विषय क्र.९३/१ अन्वये मान्य झाला आहे. या मंजूर ठरावानुसार मानधनाची रक्कम महानगरपालिका प्रशासन व श्री.जावळे यांनी आपापसात ठरवून, प्रस्ताव मा.सर्व सभेत ठेवण्याबाबत स्थायी समितीचे निर्देश आहेत.

त्या अनुषंगाने श्री.जी.बी.जावळे यांना मानधनाबाबत व अटी बाबत पत्र क्र.काअ/मनपा/पापु/ ११५८ दिनांक ०५.१०.२००४ अन्वये विचारणा केली असता त्यांनी त्यांचे पत्र दिनांक

०७.१०.२००४ द्वारे खालील अटीवर महानगरपालिका सेवेमध्ये सेवा देण्यास तयार असल्याचे कळविले आहे.

१. रूपये १५,०००/- प्रति माह मानधन मिळावे.

२. महिन्यातून साधारणत: पंधरा दिवस काम करून म.न.पा.तर्फे प्रस्तावीत मोठे प्रकल्प व प्रस्तावाचे काम पहाणे, हाताळणे इत्यादी कामे ते करतील.

श्री.जी.बी.जावळे यांच्या संमतीपत्रावर मा.आयुक्त, महानगरपालिका यांनी खालीलप्रमाणे शिफारस केली आहे.

१. श्री.जी.बी.जावळे यांची नियुक्ती महानगरपालिका सेवेमध्ये रूपये १२,०००/- प्रति माह मानधनावर एक वर्षाच्या कालावधी साठी राहील.

२. श्री.जावळे यांनी माहिन्यातून किमान १५ दिवस आणि गरजेनूसार केंव्हाही महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभागाचे कामात मदत करावी.

तरी उक्त प्रमाणे श्री.जी.बी.जावळे यांच्या मानधनावरील एक वर्षाच्या सेवे संदर्भात प्रशासनाने घेतलेल्या निर्णयानुसार प्रति माह रूपये १२,०००/- मानधनावर महानगरपालिका सेवेत तांत्रिक सल्लागार (मदतनिस) म्हणून घेण्याचा प्रस्ताव विचारार्थ तथा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, श्री.जी.बी.जावळे, (निवृत्त उप अभियंता) यांना औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजने वरील त्यांचा कामाचा अनुभव महानगरपालिका कार्यालयास त्यांची असलेली गरज लक्षात घेता श्री.जी.बी.जावळे यांना एक वर्षाच्या कालावधी करीता रूपये १२,०००/- प्रति माह मानधनावर तांत्रिक सल्लागार (मदतनिस अभियंता) म्हणून घेण्याबाबत सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. श्री.जी.बी.जावळे यांनी महिन्यातून किमान १५ दिवस आणि कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांना जेंव्हा गरज वाटेल तेंव्हा महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभागाचे कामात मदत करावी. तसेच मुख्यालय सोडून बाहेरगावी जातांना त्यांनी कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांचे सहमतीने आणि परवानगीने मुख्यालय सोडावे. श्री.जी.बी.जावळे यांच्या कामाचा कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) यांनी वेळोवेळी आढावा घेत जावा. काम समाधानकारक नसल्यास विनासूचना केंव्हाही श्री.जी.बी.जावळे यांच्या सेवा समाप्त होतील. मानधना व्यतिरिक्त कोणतेही भत्ते देय होणार नाहीत या अटीवर श्री.जी.बी.जावळे यांच्या मानधनावरील नियूक्तीस सर्वानुमते मान्यता देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८९/३ :**

अतिरिक्त शहर अभियंता,महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, रेल्वेस्टेशन ते कोकणवाडी १०० फुट 'रूंद विकास योजना रस्त्याचे आधुनिकीकरण करणे' या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा दरसुची २००२-२००३ प्रमाणे तयार करण्यांत आले आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक रू.७३,८३,६८६/- चे आहे. प्रस्तावित कामा अंतर्गत १०० फुट रूंद रस्त्याचे पुनर्डांबरीकरण करणे, रस्ता रूंद करणे. रस्त्याच्या बाजूस पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी गटार बांधणे या बाबींचा समावेश आहे. प्रस्तावित कामा करिता सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात रू.३० लक्ष तरतूद करण्यात आलेली आहे व रू.३० लक्ष रकमेमधुन पुर्ण रस्त्याचे मजबुतीकरण करणे अशक्य आहे.

प्रस्तावित कामाची निविदा काढून कार्यादेश देईपर्यंत ३ महिने एवढा कालावधी लागेल त्यामुळे सदर कामावर डिसेबंर २००४ अखेर पर्यंत पूर्ण खर्च होणार नसल्याने सुधारित अंदाजपत्रकात या कामाकरीता वाढीव तरतूद उपलब्ध करून देण्यात येईल, त्याप्रमाणे सुधारीत अंदाजपत्रक सादर करतांना प्रस्ताव सादर केला जाईल. तरी रू.७३,८३,६८६/- चे अंदाजपत्रक मा.सर्वसाधारण सभेसमोर मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रेल्वेस्टेशन ते कोकणवाडी १०० फुट 'रूंद विकास योजना रस्त्याचे आधुनिकीकरण करणे' या कामाचे रू.७३,८३,६८६/- चे अंदाजपत्रकास तसेच सदर कामासाठी रू.३० लक्षची तरतूद करण्यात आलेली आहे, सुधारीत अंदाजपत्रकात या कामाकरीता वाढीव तरतूद उपलब्ध करून देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९०/४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सौ.ज्ञानदा भाग्यरवी कुलकर्णी, यांची दि.२४.०५.८४ आदेशान्वये सांस्कृतिक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. सांस्कृतिक अधिकारी म्हणून कार्यरत असतांना त्यांनी प्रशासनास दि.०२.०६.२००० रोजी विनंती अर्ज करून राज्य साधन केंद्र, औरंगाबाद येथील संचालक पदासाठी कार्यालया मार्फत अर्ज पाठविण्यात यावा अशी विनंती केली त्यानुसार तत्कालीन मा.आयुक्त यांनी अर्ज पाठविण्यास संमती दिल्यानुसार दि.०३.०६.२००० च्या पत्रान्वये त्यांचा संचालक पदाचा अर्ज संचालक प्रौढ शिक्षण पुणे यांच्याकडे पाठविण्यात आला त्यानंतर त्यांची दि.०९.११.२००० रोजी मुलाखत झाली व मुलाखतीस जाण्या बाबत कार्यालयास तसे विनंती अर्जाद्वारे कळविण्यात आले होते. दि.०४.०६.२००१ शिक्षण संचालक (प्रौढ शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या पत्रान्वये की, सौ.ज्ञानदा कुलकर्णी यांची हजर झाल्याच्या तारखेपासून दोन (२) वर्षाच्या कालावधीसाठी संचालक पदावर निवड झाल्याचे कळविले होते. त्यानुसार मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रस्ताव ठेवण्यात आला होता. दि.२०.०६.२००१ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेच्या बैठकीत ठराव क्र.४२७/३ अन्वये डॉ.सौ.ज्ञानदा कुलकर्णी, यांना संचालक राज्य साधन केंद्र, औरंगाबाद या पदावर दोन वर्षाच्या प्रतिनियुक्तीवर पाठविण्यास मान्यता देण्यात आली. ठरावात मंजूर झाल्यानुसार तत्कालीन मा.आयुक्त यांनी दि.०९.०८.२००१ च्या पृष्ठाकनानूसार प्रशासकिय मान्यता देवून दि.२५.०६.२००१ च्या पत्रान्वये त्यांना दोन वर्षाच्या कालावधीसाठी संचालक राज्य साधन केंद्र, या पदावर प्रतिनियुक्तीने रूजू होण्यास संमती देण्यात आली होती व त्यांना दि.०९.०८.२००१ रोजी मध्यान्हा नंतर कार्यमुक्त करण्यात आले होते व त्यांचा दोन वर्षाचा कालावधी दि.०८.०८.२००३ रोजी पूर्ण झालेला आहे.

त्यानंतर संचालक महाराष्ट्र राज्य प्रौढ शिक्षण संस्था, राज्य साधन केंद्र, औरंगाबाद यांनी दि.२२.०७.२००३ रोजी पत्र पाठवून व पत्रासोबत नियामक मंडळाच्या सभेतील ठराव पाठवून सौ.ज्ञानदा कुलकर्णी, यांची दि.०९.०८.२००३ पासून पुढे दोन वर्षासाठी प्रतिनियुक्तीच्या कालावधीस मुदत वाढ द्यावी म्हणून विनंती केली होती. परंतू दि.०९.०८.२००३ नंतर मुदत वाढ देण्यासाठी मान्यता मिळालेली नाही. तथापी सौ.ज्ञानदा कुलकर्णी, ह्या दि.०९.०८.२००४ रोजी सांस्कृतिक अधिकारी या पदावर रूजू झाल्या असून त्यांना रूजू करून घेण्यात आलेले आहे. परंतू त्यांचा दि.०९.०८.२००३ ते ०८.०८.२००४ ह्या एका वर्षाच्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीस कोणत्याही प्रकारची प्रशासकीय मान्यता नव्हती.

करिता, सौ.ज्ञानदा कुलकर्णी, सांस्कृतिक अधिकारी यांचा दि.०९.०८.२००३ ते ०८.०८.२००४ या एक वर्षाच्या प्रतिनियुक्तीच्या कालावधी बाबत निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ व निर्णयार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सौ.ज्ञानदा कुलकर्णी, सांस्कृतिक अधिकारी यांचा दि.०९.०८.२००३ ते ०८.०८.२००४ या एक वर्षाच्या प्रतिनियुक्तीच्या कालावधीस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९१/५ :**

सहाय्यक संचालक नगर रचना, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मौजे हर्सूल / जाधववाडी येथील सर्व्हे क्रमांक १९२/५ ही मिळकत औरंगाबाद शहर मंजूर विकास

(वाढीव हद्द) नुसार ३६ मीटर रूंद रस्ता या प्रस्तावाने अंशत: बाधित असून मिळकत धारकाने बाधित क्षेत्र संपादन करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये खरेदी सूचना औरंगाबाद महानगरपालिकेस दिनांक ०२.०७.२००४ रोजी बजावलेली आहे.

उपरोक्त परिसराचा विकास लक्षात घेता आणि त्या परिसरात देण्यात आलेले रेखांकन मंजूर नुसार झालेला विकास पाहता ३६ मीटर रूंद रस्ता जलगाव रोड ते पिसादेवी (मयुर पार्क ) सह २४ मीटर रूंद रस्त्याचे भूसंपादन करणे आवश्यक आहे. करीता सर्व्हे क्रमांक १९२/५ या मिळकतधारकाने दिलेली खरेदी सूचना नुसार इतर बाधित मिळकती सह सर्व्हे क्रमांक १६५,१६६, १८२,१८६, १५९, १५८, १५७,१५४,१३८,१३३,१३२,१३१,१५,९९,१३०,१५६,१३७,१५३,१५२,१३४,१९२ इत्यादी या सर्व मिळकती पैकी च्या मिळकतीचे बाधित क्षेत्र संपादन करणे उचित होईल.

औरंगाबाद शहर मंजूर विकास योजना अंमलबजावणी अहवालानूसार सदर रस्त्याचे भूसंपादनासाठी सन २००८-०९ वर्ष दर्शविलेले आहे. तथापि मिळकत धारकाने खरेदी सूचना दिलेली असल्याने आणि सदर रस्त्यावर महानगरपालिके तर्फे जलनिसा:रण वाहिनी तातडीने टाकावयाची असल्याने आणि त्या परिसरातील झालेला विकास पाहता उक्त मिळकतधारकाचे मिळकती व्यतिरिक्त वरील बाधित होणाऱ्या मिळकतीचे बाधित क्षेत्र सुध्दा संपादन करणे उचित होईल. सदर संपूर्ण रस्त्या खालील बाधित क्षेत ७.५६ हेक्टर असून अंदाजे मोबदला रूपये ३.५० कोटी अपेक्षित आहे.

प्रकरणांत खरेदी सूचना दिनांक ०२.०७.२००४ रोजी दिलेली असल्याने भूसंपादन प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी यांच्याकडे सहा महिन्याच्या आत म्हणजेच ०१.०१.२००५ पूर्वी पाठविणे आवश्यक आहे नसता रस्त्याच्या भूसंपादनाची कार्यवाही व्यपगत होईल.

करीता वरील ३६ मीटर रूंद रस्त्याने बाधित मिळकती संपादीत करण्यासाठी व त्यास लागणाऱ्या भूसंपादन खर्च अंदाजे ३.५० कोटी खर्चास मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मौजे हर्सूल / जाधववाडी येथील सर्व्हे क्रमांक १९२/५ च्या मिळकत धारकाने त्यांचे मिळकत ३६ मी.रूंद रस्त्याने बाधित होत असल्याने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२७ अन्वये सूचना दिलेली आहे. विहीत मुदतीत भूसंपादन कार्यवाही करणे आवश्यक असल्याने प्रस्तावात नमूद केलेल्या मिळकती मधून ३६ मी. व २४ मी. रूंद रस्त्याने सर्व बाधित मिळकतीचे भूसंपादन करण्यास व भूसंपादनासाठी येणारे संभाव्य रू.३.५० कोटी खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९२/६ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, सन २००४-०५ च्या अर्थसंकल्पात पृष्ठ क्रमांक ११५ वर वाचनालय /उर्दु वाचनालय या लेखाशिर्षाअंतर्गत अ.क्र.-०३ अन्वये प्रभाग क्र.-५३, एन-६ महानगरपालिका शाळेच्या खुल्या जागेत वाचनालय बांधणेसाठी रक्कम रूपये ५/- लाखाची तरतुद ठेवण्यांत आलेली आहे. त्याऐवजी लेखाशिर्ष बदलुन सदरील रक्कम रूपये ५/- लाख ही सिडको प्रभाग क्र.-५३ मधील एन-६ च्या मुख्य चौकात कॉक्रेटींग करणेच्या कामांसाठी वळती करण्यांत यावी. या कामासाठी सिडको प्रशासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेले आहे.

करिता प्रस्ताव स्विकृतीसह मंजुरीस्तव सादर.

सुचक : सौ.विमलताई राजपूत अनुमोदक : श्री.सोपान पारे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.-५३, एन-६ महानगरपालिका शाळेच्या खुल्या जागेत वाचनालय बांधणेसाठी ठेवण्यांत आलेली र.रू.५/- लाखाची तरतुदीचे लेखाशिर्ष बदलून प्रभाग क्र.-५३ मधील एन-६ च्या मुख्य चौकात कॉक्रेटींग करणेसाठी लेखाशिर्षक बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९३/७ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मा.खा.श्री.चंद्रकांतजी खैरे यांनी शहरातील विविध भागातील अनधिकृत वसाहतींमध्ये हापसे बसविणे त्याचप्रमाणे रस्त्याचे खडीकरण/ डांबरीकरणाचे कामासाठी स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम निधी उपलब्ध करून देण्यांस संमती दिलेली आहे. खालील दर्शविलेली कामे करण्याकरीता महापालिकेतर्फे ना हरकत प्रमाणपत्र (एन.ओ.सी.) देण्याकरीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

१. शहरातील विविध भागातील अनधिकृत वसाहतीमध्ये आवश्यकतेनुसार - रू.१८.०० लक्ष
६० ठिकाणी हापसे बसविणे.

२. शहरातील विविध भागातील अनधिकृत वसाहतीमध्ये खडीकरण/ - रू.२५.०० लक्ष
डांबरीकरण करणे.

सुचक : श्री.नंदकुमार घोडेले अनुमोदक : श्री.किशनचंद तनवाणी, श्री.राधाकृष्ण गायकवाड

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.खा.श्री.चंद्रकांतजी खैरे यांच्या स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम निधी उपलब्ध करून देण्यांस संमती दिलेली आहे. खालील दर्शविलेली कामे करण्याकरीता महापालिकेतर्फे ना हरकत प्रमाणपत्र (एन.ओ.सी.) देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

१. शहरातील विविध भागातील अनधिकृत वसाहतीमध्ये आवश्यकतेनुसार - रू.१८.०० लक्ष
६० ठिकाणी हापसे बसविणे.

२. शहरातील विविध भागातील अनधिकृत वसाहतीमध्ये खडीकरण/ - रू.२५.०० लक्ष
डांबरीकरण करणे.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९४/८ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, मा.खा.श्री.राजकुमारजी धुत यांनी शहरातील पुंडलिकनगर येथील (अनधिकृत वसाहत) अंतर्गत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणेच्या कामाकरीता संमती दर्शविलेली आहे. सदरील काम करण्याकरीता महापालिकेतर्फे ना हरकत प्रमाणपत्र (एन.ओ.सी.) देण्याकरीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

१. पुंडलिकनगर येथील अंतर्गत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे - रूपये १५.०० लक्ष

सुचक : श्री.नंदकुमार घोडेले अनुमोदक : श्री.किशनचंद तनवाणी, श्री.राधाकृष्ण गायकवाड

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.खा.श्री.राजकुमारजी धुत यांनी शहरातील पुंडलिकनगर येथील (अनधिकृत वसाहत) अंतर्गत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणेच्या कामाकरीता संमती दर्शविलेली आहे. सदरील काम करण्याकरीता महापालिकेतर्फे ना हरकत प्रमाणपत्र (एन.ओ.सी.) देण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते.

१. पुंडलिकनगर येथील अंतर्गत रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे - रूपये १५.०० लक्ष

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९५/९ :**

मिळकत नगर भुमापन क्रमांक १९०४८ व १९०४८/1 डेक्कन फ्लोअर मील ह्या मंजूर विकास योजनेमध्ये रहिवास विभागात समाविष्ट असून पैकी भागश: क्षेत्र अस्तित्वातील जमिनीचा होत असलेल्या वापरानुसार औद्योगिक क्षेत्रात आहे.

डेक्कन फ्लोअर मीलचा औद्योगिक वापर गेल्या दहा वर्षापासून बंद आहे. त्या ठिकाणी कुठलीही यंत्रणा कार्यरत नाही व औद्योगिक वापर सुरू नाही. मंजूर विकास योजनेनुसार औद्योगिक विभागात समाविष्ट क्षेत्राच्या पुर्वेला पैठणला जाणारा राज्य मार्ग आहे व इतर सर्व बाजुंनी असलेला उर्वरीत भाग रहिवास विभागात समाविष्ट आहे.

लगत सर्व बाजुंच्या रहिवास विभागाचा विचार करता वर नमूद केलेल्या मिळकतींमधील औद्योगिक विभागात असणारे क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करणे योग्य होईल.

करीता सदरचे औद्योगिक विभागात समाविष्ट क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव कार्यान्वित करण्यासाठीची मान्यता होणे साठी व ही कार्यवाही पूर्ण करून शासनास सादर करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्तांना प्रदान करणेसाठी प्रस्ताव स्विकृतीसह सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : सौ.निर्मला विठ्ठलराव कांबळे अनुमोदक : श्री.मिर हिदायत अली

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मिळकत नगर भुमापन क्रमांक १९०४८ व १९०४८/१ डेक्कन फ्लोअर मील ह्या मंजूर विकास योजनेमध्ये रहिवास विभागात समाविष्ट असून पैकी भागश: क्षेत्र अस्तित्वातील जमिनीचा होत असलेल्या वापरानुसार औद्योगिक क्षेत्रात असल्यामूळे सदरील क्षेत्र रहीवासी विभागात समाविष्ट करणे करीता महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये फेरबदलास व ही कार्यवाही पूर्ण करणेस व सदर प्रस्ताव शासनास सादर करण्याचे सर्व अधिकार मा.आयुक्तांना प्रदान करणेस सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९६/१० :**

मराठी भाषिक चित्रपट 'श्वास' चे ऑस्कर पुरस्कारासाठी नामांकन झालेले आहे, जे की तमाम महाराष्ट्र वासियांसाठी निश्चितपणे अभिमानास्पद बाब आहे. मराठी चित्रपटांची घोडदौड पुढं नेणाऱ्या श्वास चित्रपटाला ऑस्करचं घोडामैदान आणखी जवळ आणायचंय. पहिल्या फ़ेरीत निवड होऊन आता अन्य ४८ चित्रपटांसोबत 'श्वास' ऑस्करच्या शर्यतीत आहे. अंतिम फ़ेरीतील पाच नामांकने २५ जानेवारीला जाहीर होणार आहेत. परदेशांत 'श्वास' अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचावा यासाठी विविध मार्ग चोखाळण्याचे कामासाठी या चित्रपट निर्मितीची टीम न्युयॉर्कला रवाना झाली असून 'श्वास' च्या पुर्व प्रसिध्दीसाठी वास्तव्य करणार आहे. श्वास चे अमेरीकेतील प्रदर्शन आणि प्रसिध्दीचं काम लॉस एंजलीस मधील एखाद्या नामांकित एजन्सीकडे सोपविण्यात येणार आहे. ती एजन्सी हॉलीवुडमधील ख्यातनाम व्यक्तींसाठी श्वास चे खेळ ठरवणं तसेच तेथील प्रसार माध्यमं आणि पत्रकारांशी संपर्क साधणे यासारखी जबाबदारी पार पाडणार आहे. हे काम अतिशय खर्चीक असणार आहे.

महाराष्ट्रातून सर्व स्तरांवरून या चित्रपटास भरघोस मदत मिळत आहे. मुंबई, पुणे, नाशिक या महापालिकांनीही यासाठी भरघोस अशी आर्थिक मदत केलेली आहे.

औरंगाबाद शहर हे सांस्कृतीचा वारसा असलेलं ऐतिहासिक पर्यटक स्थळ म्हणून ओळखले जाते. आपल्या महानगरपालिकेकडून सुध्दा 'श्वास' या चित्रपटास ऑस्कर पुरस्काराच्या स्पर्धेत टिकण्यासाठी आर्थिक सहभाग म्हणून रूपये ३.०० लक्ष इतकी रक्कम 'श्वास' ऑस्कर फ़ंड करीता देण्यास्तव व आपल्या शुभेच्छा कळविण्याकरीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

सुचक: श्री.किशनचंद तनवाणी, श्री.नंदकुमार घोडेले श्री.आनंद तांदुळवाडीकर,श्री.जगदीश सिध्द

अनुमोदक : श्री.मीर हिदायत अली, श्री.राजेंद्रसिंग जबिंदा, श्री.प्रकाश निकाळजे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्रातून सर्व स्तरावरून श्वास या चित्रपटास भरघोस मदत मिळत आहे. मुंबई, पुणे, नाशिक या महानगरपालिकांनी यासाठी भरघोस अशी आर्थिक मदत केलेली आहे. औरंगाबाद शहर हे सांस्कृतीचा वारसा असलेले ऐतिहासिक पर्यटन स्थळ म्हणून ओळखले जाते करीता औरंगाबाद महानगरपालिके कडून श्वास या चित्रपटास, श्वास ऑस्कर फ़ंडा करीता रक्कम रूपये ३.०० लक्षची आर्थिक मदत करण्यास व शुभेच्छा कळविण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४९७/११ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, प्रतिवर्षा प्रमाणे या वर्षीही अपंगाच्या महापौर चषक स्पर्धा घेण्यांत याव्यात सदरील विविध स्पर्धेकरीता अंदाजे रू.१.५० लक्ष (एक लाख पन्नास हजार) चा खर्च महापौर चषक स्पर्धे करीता राखीव असलेल्या निधीतून करणेस व महापौर चषक अपंगाच्या विविध स्पर्धा आयोजित करणे करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे मंजूरीस्तव सादर.

सुचक : सौ.साधना सुरडकर अनुमोदक : श्री.किशनचंद तनवाणी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महापौर चषक अपंगाच्या विविध स्पर्धा आयोजित करणेस व या स्पर्धेकरीता अंदाजे रू.१.५० लक्ष (एक लाख पन्नास हजार) चा खर्च महापौर चषक स्पर्धे करीता राखीव असलेल्या निधीतून करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४९८/१२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद जिल्हा ज्युदो संघटनेतर्फे महापौर चषक ज्युदो स्पर्धेचे (राज्यस्तरीय) आयोजन दि.०२ डिसेबंर ते ०४ डिसेबंर ०४ या कालावधीत करण्यात आलेले आहे. करीता सदरील राज्यस्तरीय महापौर चषक स्पर्धेकरीता अंदाजे २.२५ लक्ष खर्च अपेक्षित आहे. करीता उपरोक्त खर्चास व महापौर चषक स्पर्धेचे आयोजना करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

सुचक : सौ.साधना सुरडकर अनुमोदक : श्री.किशनचंद तनवाणी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद जिल्हा ज्युदो संघटनेतर्फे महापौर चषक ज्युदो स्पर्धेचे (राज्यस्तरीय) आयोजन केलेल्या दि.०२ डिसेबंर ते ०४ डिसेबंर ०४ या कालावधीतील स्पर्धेकरीता अंदाजे २.२५ लक्ष अपेक्षित खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.४९९/१३ :**

ज्योतीनगर प्रभागातील जलतरण तलावाकरीता या वर्षीच्या अर्थसंकल्पात २० लक्ष रू.ची तरतूद केली आहे. ती तरतूद जलतरण तलावाऐवजी प्रभागातील खालील कामांकरिता वर्ग करण्यात यावी.

१. दशमेशनगर ते श्रेयनगर ५० फुट रस्त्याचे खडीकरण करणे. - ५ लाख रू.
२. वार्ड क्र.२२ मध्ये विविध ठिकाणी डांबरीकरण व पॅचअप करणे - ८ लाख रू.
३. जयनगर व ज्योतीनगर येथील खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे व सुशोभिकरण करणे. - १ लाख रू.
४. वार्ड क्र.२२ मध्ये विविध ठिकाणी सोडीयम दिवे बसविणे. - २ लाख रू.
५. ज्योतीनगर येथील उद्यानाचे सुशोभिकरण व दुरूस्ती करणे. - ४ लाख रू.

करिता प्रस्ताव स्विकृतीसह मान्यतेस्तव सादर.

सुचक : सौ.विजया रहाटकर, श्री.काशिनाथ कोकाटे, श्रीमती जयश्री किवळेकर

अनुमोदक : सौ.साधना सुरडकर, श्री.भरत लकडे, श्री.प्रल्हाद निमगांवकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,ज्योतीनगर प्रभागातील जलतरण तलावाकरीता या वर्षीच्या अर्थसंकल्पात २० लक्ष रू.ची ठेवण्यांत आलेली तरतूद प्रस्तावित अ.क्र.१ ते ५ साठी वर्ग करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५००/१४ :**

ज्योतीनगर येथील वाचनालयास कै.शरदभाऊ कुलकर्णी यांचे नांव देण्यात यावे व या वाचनालयाच्या वतीने दर वर्षी ३ दिवसांची कै.शरदभाऊ कुलकर्णी स्मृती व्याख्यानमाला सुरू करण्यात यावी. करीता प्रस्ताव स्विकृतीसह मान्यतेस्तव सादर.

सुचक : सौ.विजया रहाटकर, श्री.काशिनाथ कोकाटे,श्री.राजु शिंदे,श्री.रतनकुमार पंडागळे, श्री.सोपान पारे, श्री.भरत लकडे

अनुमोदक : सौ.साधना सुरडकर, श्री.प्रल्हाद निमगांवकर

**ठराव :**

ज्योतीनगर येथील वाचनालयास कै.शरदभाऊ कुलकर्णी यांचे नांव देण्यांस तसेच वाचनालयाच्या वतीने दर वर्षी ३ दिवसांची कै.शरदभाऊ कुलकर्णी स्मृती व्याख्यानमाला सुरू करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५०१/१५ :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, महानगरपालिकेच्या दिनांक २७.०५.२००३ रोजीच्या सर्वसाधारण सभेत ठराव क्र.८०/२ अन्वये दैनिक वेतनावरील कर्मचाऱ्यांचे निधन झाल्यास किंवा अपंगत्व आल्यास त्यांचे जागेवर त्यांच्या कुटूंबातील व्यक्तिस नोकरीवर घेण्याचा ठराव पारित केलेला आहे. तसेच मा.न्यायालयाच्या जेष्ठता यादीत ज्यांचा समावेश आहे. परंतू तो कर्मचारी महानगरपालिकेची सेवा करीत असतांना मृत्यु पावलेला आहे. मा.न्यायालयाच्या जेष्टता यादीनुसार मृत्यु पावलेल्या कर्मचाऱ्यांची जागा जो पर्यंत त्यांच्या पाल्यांना मनपा सेवेत सामावून घेत नाही. तो पर्यंत त्यांची जागा रिक्त ठेवावी त्यांच्या जागेवर इतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात येऊ नये. जेणे करून मृत्यु पावलेल्या कर्मचाऱ्याच्या कुटूंबियास न्याय मिळेल करीता प्रस्ताव सर्वानुमते मान्यतेस्तव सादर.

सुचक : सौ.लिलावती घायतिलक अनुमोदक : सौ.विजया रहाटकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा.न्यायालयाच्या जेष्ठता यादीत ज्यांचा समावेश आहे. परंतू तो कर्मचारी महानगरपालिकेची सेवा करीत असतांना मृत्यु पावलेला आहे. मा.न्यायालयाच्या जेष्टता यादीनुसार मृत्यु पावलेल्या कर्मचाऱ्यांची जागा जो पर्यंत त्यांच्या पाल्यांना मनपा सेवेत सामावून घेत नाही. तो पर्यंत त्यांची जागा रिक्त ठेवण्यास तसेच त्यांच्या जागेवर इतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती न करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५०२/१६ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, संजयनगर,वार्ड क्र.१२ येथील रामनगर भिंतीलगत अर्धगोलाकार गटार बांधणे अर्थसंकल्प २००४-२००५ मधील समाविष्ट कामा ऐवजी त्या कामाचे शिर्षक बदलून संजयनगर वार्ड क्र.१२ येथील अरूंद गल्ल्यात ढाप्यासह कॉंक्रीट करणे च्या कामासाठी वरील कामाचा निधी वापरण्यात यावा, करीता प्रस्ताव सर्वानुमते मान्यतेस्तव सादर.

सुचक : सौ.लिलावती घायतिलक अनुमोदक : सौ.साधना सुरडकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संजयनगर,वार्ड क्र.१२ येथील रामनगर भिंतीलगत अर्धगोलाकार गटार बांधणे करीता अर्थसंकल्प २००४-२००५ मध्ये ठेवण्यांत आलेल्या कामाचे शिर्षक बदलून संजयनगर वार्ड क्र.१२ येथील अरूंद गल्ल्यात ढाप्यासह कॉंक्रीट करणे च्या कामासाठी लेखा शिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५०३/१७ :**

तरूण मित्र मंडळ,औरंगाबाद च्या वतीने राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धांचे आयोजन आपल्या शहरात करण्यांत येणार आहे. यापुर्वीही तरूण मित्र मंडळाने राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धांचे यशस्वी आयोजन केलेले आहे. क्रिडा क्षेत्रात शहराचे नांव राज्यस्तरावर झळकण्यास यामुळे मदत होणार आहे. तरी

राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धांचे आयोजनाकरीता महापालिकेतर्फे रूपये ५.०० लक्षची आर्थिक मदत देण्याकरीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.काशिनाथ कोकाटे, श्री.किशनचंद तनवाणी

अनुमोदक : श्री.भगवान घडमोडे, श्रीमती जयश्री किवळेकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, तरूण मित्र मंडळ,औरंगाबाद च्या वतीने राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धांचे आयोजना करीता महापालिकेतर्फे रूपये ५.०० लक्षची आर्थिक मदत देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५०४/१८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.एक पडेगांव येथे आर.सी.सी.पाईप टाकून रस्ता तयार करणे हे गरजेचे नसल्याने सदर कामाला रद्द करून या ऐवजी प्रभाग क्र.एक भावसिंगपूरा जूनेगांव येथे पुनर्डांबरीकरण करणे हे काम अर्थसंकल्प ०४.०५ मध्ये समाविष्ट करण्यात यावे व संदर्भीय कामाची तरतूद रू.रक्कम ३.०० लाख हे प्रभाग क्र.एक भावसिंगपूरा जुने गांव येथे पुनर्डांबरीकरण साठी वापरण्यात यावीत व सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात यावे, हि विनंती. व मा.सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजूर करावा हि विनंती.

सुचक : श्री.ठकूजी रामसिंग वाणी अनुमोदक:१.श्री.किशोर तुलशीबागवाले,२.श्री.जगदीश सिध्द

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.एक पडेगांव येथे आर.सी.सी.पाईप टाकणेच्या कामासाठी ठेवण्यात आलेली र.रू.३.०० लाखाच्या तरतूदीचे शिर्षक बदलून प्रभाग क्र.१ मधील जूने भावसिंगपूरा येथे पुनर्डांबरीकरण करणे या कामासाठी लेखा शिर्ष बदलणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५०५/१९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक ०५.०८.२००४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेत विषय क्र.४४९/२० अन्वये कोकणवाडी प्रभागातील न.भू.क्र.१८२३५/1 क्षेत्र ९१०.९० चौ.मी. जमिन शैक्षणिक कारणास्तव महानगरपालिकेने संपादीत केलेली आहे. व खाजगी संस्थाना प्रदान करण्याचे मान्यता दिली आहे. महानगरपालिका यासाठी भुसंपादन संस्था (समुचित प्राधिकरण) असल्यामूळे आणि महानगरपालिकेने जी जमिन यापूर्वीच संपादीत केली असल्यामूळे अशा परिस्थितीत इतर खाजगी संस्थाना ही जमिन प्रदान करणे व त्यांना समुचित प्राधिकरण घोषीत करणे महानगरपालिकेचे हीताचे नाही. तसेच सदर ठराव पारीत होऊन तीन महिन्याचा कालावधी झालेल्या असल्याने आता हा प्रस्ताव विषय क्र.४४९/२० रद्द करण्यासाठी सर्वसाधारण सभे पुढे मान्यतेस्तव सादर करण्यात येते.

सुचक : श्री.नंदकुमार घोडेले अनुमोदक : श्री.आनंद तांदुळवाडीकर

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिनांक ०५.०८.२००४ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेतील विषय क्र.४४९/२० अन्वये मंजूर करण्यात आलेला प्रस्ताव, सदर प्रस्तावात नमूद केलेल्या कारणास्तव याद्वारे रद्द करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५०६/२० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.२६ मधिल नागसेननगर, मिलींदनगर,कबिरनगर, मुरलिधरनगर या वसाहतीतील अंतर्गत विविध मुख्य रस्त्यांना आंबेडकरी चळवळी मध्ये सहभागी झालेल्या सामाजिक कार्यकर्ते बुध्दवासी माधवराव पुंजाजी धनेधर, माधव यादव दाभाडे, लक्ष्मणराव आनंदराव साळवे, भास्कर कांबळे, इंदुबाई थोरात, रामभाऊ मोरे व एकनाथ नगर वार्ड

क्र.२७ मधिल रस्त्यांना बुध्दवासी पी.एन.मगरे गुरुजी व रवि शेंडे यांची नांवे देणे बाबत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.माणिक साळवे अनुमोदक : श्री.प्रकाश निकाळजे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.२६ मधिल नागसेननगर, मिलींदनगर,कबिरनगर, मुरलिधरनगर या वसाहतीतील अंतर्गत विविध मुख्य रस्त्यांना सामाजिक कार्यकर्ते बुध्दवासी माधवराव पुंजाजी धनेधर, माधव यादव दाभाडे, लक्ष्मणराव आनंदराव साळवे, भास्कर कांबळे, इंदुबाई थोरात, रामभाऊ मोरे व एकनाथ नगर वार्ड क्र.२७ मधिल रस्त्यांना बुध्दवासी पी.एन.मगरे गुरूजी व रवि शेंडे यांची नांवे देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५०७/२१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मुंकूदवाडी-संजयनगर येथील मुस्लीम समाजासाठी या भागात त्यांची असलेली स्मशानभूमी कब्रस्तान ही जागा लोकसंख्येच्या दृष्टीकोनातून अपुरी होत असल्याने त्यांना विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे.

करीता मुंकुदवाडी जुने गांव येथील स.नं.२५ मध्ये असलेल्या हिंदु स्मशानभूमीच्या शेजारी असलेली महानगरपालिकेची मोकळी जागा मुस्लीम समाजाच्या कब्रस्ताना करीता देण्यात यावी व त्या ठिकाणी कंपाऊंड बांधून योग्य त्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपूढे मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.मोतीलाल जगताप अनुमोदक : श्री.मिर हिदायत अली, सौ.लिलावती घायतिलक

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुंकुदवाडी जुने गांव येथील स.नं.२५ मध्ये असलेल्या हिंदु स्मशानभूमीच्या शेजारी असलेली महानगरपालिकेची मोकळी जागा मुस्लीम समाजाच्या कब्रस्ताना करीता देणेस तसेच त्या ठिकाणी कंपाऊंड बांधून योग्य त्या सुविधा उपलब्ध करून देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५०८/२२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, प्रभाग क्र.३४ कोटला कॉलनी येथील पोलीस कॉलनी मध्ये सन २००४-२००५ च्या अर्थसंकल्पात व्यायाम शाळा बांधणेसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. त्याऐवजी प्रभाग क्र.३४ मधील मनपाच्या खुल्या जागेत शनी मंदिराजवळील संरक्षित भिंत अगोदरच बांधण्यात आलेली आहे. तरी सदरच्या जागेत व्यायामशाळा बांधण्यात यावी.

करीता प्रस्ताव स्विकृतीसह मंजूरीस्तव सादर.

सुचक : श्री.डॉ.भागवत कराड अनुमोदक : श्री.भाऊसाहेब ताठे, श्री.काशिनाथ कोकाटे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र.३४ पोलीस कॉलनी येथे व्यायाम शाळा बांधणेसाठी ठेवण्यांत आलेली तरतूद शनी मंदिराजवळील महापालिकेच्या खुल्या जागेमध्ये व्यायाम शाळा बांधणेसाठी वर्ग करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५०९/२३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २००४-२००५ या आर्थिक वर्षातील महापौर चषक क्रिडा स्पर्धा अंतर्गत सॉप्टबॉल क्रिकेट स्पर्धा घेण्यात याव्यात. तसेच सदरील स्पर्धा औरंगाबाद जिल्हा सॉप्टबॉल असोसिएशन या संस्थेमार्फत घेण्यात याव्यात.

करिता सदरचा प्रस्ताव ऐनवेळी स्विकृतीसह मंजुरीस्तव सादर.

सुचक : श्री.मिर हिदायत अली अनुमोदक : ०१. श्री.काशिनाथ कोकाटे, ०२. श्री.मोहन मेघावाले

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन २००४-२००५ या आर्थिक वर्षातील महापौर चषक क्रिडा स्पर्धा अंतर्गत सॉप्टबॉल क्रिकेट स्पर्धा घेणेस, तसेच सदरील स्पर्धा औरंगाबाद जिल्हा सॉप्टबॉल असोसिएशन या संस्थेमार्फत घेणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५१०/२४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, हैद्राबाद महानगरपालिकेमध्ये शहराच्या विकासासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतात यात प्रामुख्याने शहर सौंदर्यीकरण,स्वच्छता, हरित शहर-सुंदर शहर विविध करांची आकारणी, झोपडपट्टी विकास व पुनर्वसन महसुल उत्पन्न वाढीसाठी विविध उपाय योजना यांचा समावेश होतो. सदरील योजना औरंगाबाद महानगरपालिकेत राबविण्यासाठी हैद्राबाद महानगरपालिकेचे अनुभवी अधिकारी-पदाधिकारी व राज्याचे नगर विकास मंत्री यांना आमंत्रित करण्यात यावे व एक कार्यशाळा आयोजीत करून त्यांचे मार्गदर्शन घ्यावे.

करिता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

सुचक : श्री.सुरजितसिंग खुंगर, अनुमोदक : श्री.मिर हिदायत अली

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हैद्राबाद महानगरपालिकेमध्ये शहराच्या विकासासाठी राबविण्यात येणारे उपक्रम जसे शहर सौंदर्यीकरण,स्वच्छता, हरित शहर-सुंदर शहर विविध करांची आकारणी, झोपडपट्टी विकास व पुनर्वसन महसुल उत्पन्न वाढीसाठी विविध उपाय योजना औरंगाबाद महानगरपालिकेत राबविण्यास तसेच हैद्राबाद महानगरपालिकेचे अनुभवी अधिकारी-पदाधिकारी व राज्याचे नगर विकास मंत्री यांना आमंत्रित करून एक कार्यशाळा आयोजीत करणेस सर्वानुमते मंजूरी देण्यात येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५११/२५ :**

गजाननगर ते मातोश्रीनगर या रस्त्याचे खडीकरण तसेच डांबरीकरण करणे अत्यंत आवश्यक आहे. परंतू अनधिकृत वसाहतीमध्ये महापालिका खर्च करीत नाही. याप्रमाणेच जय भवानीनगर, पुंडलिकनगर भागात देखील रस्त्यांचे काम करणे आवश्यक आहे. या वसाहतीमध्ये रस्त्यांचे खडीकरण, डांबरीकरणाचे कामाकरीता मा.आमदार, मा.खासदार यांनी स्थानिक विकास निधीतून आर्थिक तरतूद उपलब्ध करून दिलेली आहे. म्हणून या भागातील कामांसाठी महापालिकेतर्फे ना हरकत प्रमाणपत्र देण्याच्या मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : सौ.कचराबाई लोखंडे अनुमोदक : श्री.किशनचंद तनवाणी, श्री.नंदकुमार घोडेले.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गजाननगर ते मातोश्रीनगर,जय भवानीनगर, पुंडलिकनगर भागात मा.आमदार, मा.खासदार यांनी उपलब्ध करून दिलेल्या स्थानिक विकास निधीतून रस्त्याचे खडीकरण तसेच डांबरीकरण करणेकरीता महापालिकेतर्फे ना हरकत प्रमाणपत्र देणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र.५१२/२६ :**

पुंडलिकनगर भागात अस्तित्वात असलेल्या विद्युत खांबावर (पोलवर) पथदिवे बसविणे आवश्यक आहे. नगरसेवक स्वेच्छानिधीतून विद्युत पथदिवे बसविण्याच्या मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

सुचक : सौ.कचराबाई लोखंडे अनुमोदक : श्री.किशनचंद तनवाणी, श्री.नंदकुमार घोडेले.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पुंडलिकनगर भागात अस्तित्वात असलेल्या विद्युत खांबावर (पोलवर) पथदिवे नगरसेवक स्वेच्छानिधीतून बसविणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच ‘‘ राष्ट्रगिताने ‘‘ सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद.